रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक १२३
www.ramprahar.com
# राम प्रहर
मंगळवार, १९ नोव्हेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## ‘एक है तो सेफ है, राहुल गांधी फेक है!’



**मुंबई :** उद्योगपती गौतम अदानी यांना विविध कंत्राटे देऊन मोठे करण्याचे काम काँग्रेसच्या काळातच झाले, असे सांगत भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांनी ‘एक है तो सेफ है, राहुल गांधी फेक है’, अशी नवी घोषणा दिली आहे. लोकसभेचे विरोधी पक्षनेते आणि काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी सोमवारी (दि. १८) प्रचाराच्या शेवटच्या दिवशी महाराष्ट्रात पत्रकार परिषद घेऊन महायुती सरकारवर टीका केली तसेच एक है तो सेफ है या भाजपच्या घोषणेवर टीका करताना उद्योगपती गौतम अदानी आणि भाजपचे संबंध असल्याचा आरोप केला होता. या पत्रकार परिषदेनंतर भाजपकडून राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांनी पत्रकार परिषद घेत अदानी आणि वाड्रा यांचे फोटो दाखवत जोरदार पलटवार केला.

अंतरंग
पिस्तूल, मॅगझीन, जिवंत राउंडसह रोख रक्कम जप्त/२
‘आमदार रविशेठ पाटील प्रचंड मताधिक्याने जिंकणार’/५
प्रचाराच्या तोफा थंडावल्या; आता तयारी मतदानाची/८

# आमदार प्रशांत ठाकूर पनवेलचे विकासपुरुष

### केंद्रीय मंत्री सुरेश गोपी यांचे गौरवोद्गार




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर हे पनवेलचे विकासपुरुष आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी देशात आणि राज्यात देवेंद्र फडणवीस काम करत आहेत. त्याच पद्धतीचे उत्कृष्ट काम आमदार प्रशांत ठाकूर हे पनवेलमध्ये करत आहेत. येत्या पाच वर्षात अधिक वेगाने पनवेलचा विकास होणार आहे. त्यासाठी या निवडणुकीत प्रशांत ठाकूर यांना आमदार म्हणून भक्कम बहुमताने विजयी करा, असे आवाहन केंद्रीय नैसर्गिक वायु, पर्यटन आणि पेट्रोलियम राज्यमंत्री सुरेश गोपी यांनी सोमवारी (दि. १८) नवीन पनवेल येथे केले.

भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय, पीआरपी व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रचारार्थ झालेल्या जाहीर सभेत ना. सुरेश गोपी बोलत होते. त्यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या कार्याचे कौतुक केले तसेच पनवेल मतदारसंघात राहणाऱ्या सर्व मल्ल्याळी आणि दक्षिण भारतीय बांधवांनी आपले मत त्यांना द्यावे, असे आवाहन केले.

ना. सुरेश गोपी यांनी पुढे बोलताना सांगितले की, भाजप आणि सहकारी पक्षांची विचारधारा सामाजिक विकासाची आहे. त्या अनुषंगाने देशात आणि राज्यात काम होत आहे. कितीही कामे केली तरी विरोधक फक्त समाजात विरोधच पसरवत असतात. त्यामुळे त्यांची मानसिकता ही देशहिताची कधीच राहिली नाही. आपण काम करत रहायचे हे आपल्या सर्वांचे उद्दिष्ट आहे आणि त्यानुसार आमदार प्रशांत ठाकूर काम करत असतात. त्यामुळेच सर्व समाजातील लोकं त्यांच्याशी जोडली गेली आहेत. शुद्ध विचाराने काम करत असल्याने त्यांना जनतेचा पाठिंबाही मिळत आहे. देशाच्या विकासासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सक्षमपणे काम होत आहे. त्याच अनुषंगाने देशात मोठ्या प्रमाणात झपाट्याने विकास होत आहे.

आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, यु-टर्न घेत सर्व विकासकामांना स्थगिती देण्याचे काम महाविकास आघाडी सरकारने त्यांच्या कार्यकाळात केले. राज्याच्या विकासापेक्षा त्यांनी स्वतःच्या विकासालाच प्राधान्य दिले. त्यामुळे जनतेला विकासाच्या दिशेने नेऊन त्यांच्या नेहमी पाठिशी असणाऱ्या महायुती सरकारला राज्यात पुन्हा सत्तेत आणा तसेच येत्या २० तारखेला कमळ चिन्हासमोरील बटन दाबून मला विजयी करा, असे आवाहनही त्यांनी या वेळी केले. (पान २ वर..)

# उरणच्या रेल्वेची कनेक्टिव्हिटी अधिक वेगाने वाढणार -रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव

■ आमदार महेश बालदी यांच्या विजयाचाही विश्वास



**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

उरण रेल्वे भविष्यात छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) आणि बोरीवलीपर्यंत जोडली जाईल. मुंबईसह उरणच्या रेल्वेची कनेक्टिव्हिटी आगामी काळात अधिक वेगाने वाढेल यासाठी आमदार महेश बालदी प्रयत्न करीत आहेत. उरणच्या सर्वांगीण विकासासाठी ते कटिबद्ध आहेत. त्यामुळे त्यांना जनता मोठ्या मताधिक्याने निवडून देईल, असा विश्वास रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी व्यक्त केला.

उरण विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार आमदार महेश बालदी यांच्या प्रचारार्थ रविवारी (दि. १७) उरण शहरात रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची सभा झाली. त्या वेळी ते बोलत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात व मुंबईमध्ये रेल्वे मोठी गुंतवणूक करीत आहे. महाराष्ट्रात एक लाख ६४ हजार कोटी रुपये खर्चून रेल्वेची गुंतवणूक होत आहे. मुंबईमध्ये १६ हजार २४० कोटींची गुंतवणूक होत आहे. यामुळे रेल्वेची क्षमता अधिक पटीने वाढणार असल्याचे रेल्वेमंत्री वैष्णव यांनी सांगितले. (पान २ वर..)

## कर्जतच्या सभेत उद्धव ठाकरेंनी व्यक्त केली शेकापवर नाराजी



**कर्जत : प्रतिनिधी**

महाविकास आघाडी रायगड जिल्ह्यात शेकापला तीन जागा देणार होती. सांगोल्यात तुम्ही आम्हाला मदत करायला हवी होती. तसे न करता तुम्ही रायगडात चार उमेदवार दिले. थोडा विचार करायला हवा होता, अशा शब्दांत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख व माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सोमवारी (दि. १८) कर्जत येथील सभेत नाराजी व्यक्त केली.

या सभेला शिवसेना सचिव मिलिंद नार्वेकर, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, संजय गवळी, कम्युनिस्ट पक्षाचे गोपाळ शेळके, शिवसेनेचे उत्तम कोळंबे, एकनाथ पिंगळे, बाबू घारे, राजाराम शेळके सुवर्णा जोशी, रेखा ठाकरे, उमेदवार नितीन सावंत, लीना गरड आदी उपस्थित होते.

# नैना प्रकल्पासाठी जयंत पाटील आग्रही; शेकापच्या दुटप्पी भूमिकेचा पर्दाफाश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शेकाप नेते जयंत पाटील यांनी नैना प्रकल्प पाहिजे असा आग्रह जाहीर सभेत करून पनवेल-उरणमधील शेकाप नेत्यांच्या दुटप्पी भूमिकेचा पर्दाफाश केला आहे. आजवर या प्रकल्पाच्या अनुषंगाने स्वार्थी राजकारण करण्याचे काम शेकापच्या स्थानिक पुढाऱ्यांनी करून जनतेची दिशाभूल केली. त्यांचे पितळ उघडे पडले आहे.

नैना प्रकल्पाच्या विरोधात स्वार्थापोटी टाहो फोडण्याचे काम शेकापचे पनवेल विधानसभा मतदारसंघातील उमेदवार बाळाराम पाटील यांनी केले, मात्र त्यांच्याच पक्षाचे सर्वेसर्वा जयंत पाटील यांनी उरणमध्ये झालेल्या एका जाहीर सभेत मी २० टक्क्यांवरही तडजोड केली असती, असे जाहीरपणे सांगत नैना प्रकल्पाला सहमती दर्शविली. विशेष म्हणजे



त्यांना नैना प्रकल्प आवडला आहे आणि त्यासाठी ते इच्छुक असल्याचेही आपल्या भाषणातून स्पष्टपणे सांगितले. त्यामुळे बाळाराम पाटील यांनी फक्त निवडणुकीसाठीच नैना प्रकल्पाचा मुद्दा समोर करून मतदारांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला, हे जयंत पाटील यांनी उरणमध्ये मांडलेल्या भूमिकेतून समोर आले आहे.

याच बाळाराम पाटील यांनी अनेकदा फक्त विकासाच्या गप्पा मारल्या. पत्रकार परिषदेत आपण विकास केल्याच्या गमजाही मारल्या, पण सातत्याने जिल्हा परिषद आणि पंचायत समितीवर शेकापची सत्ता राहिली आणि ते जिल्हा परिषदेचे अध्यक्षही होऊन गेले. तरीदेखील त्यांना गेल्या २० वर्षांपासून पनवेल पंचायत समितीची साधी इमारत पूर्ण करता आली नाही की जिल्हा परिषद शाळेची घटती पटसंख्या रोखण्यात उपाययोजना करता आली नाही.

कर्नाळा बँक घोटाळ्यातील पैसे आपण मिळवून दिले अशा वल्गना बाळाराम पाटील यांनी सतत केल्या, मात्र हे पैसे मिळवून देण्यासाठी मागणी, पत्रव्यवहार, पाठपुरावा, आंदोलने, मोर्चे कुठे काढले याची त्यांना ब्र शब्दाने माहिती आजपर्यंत देता आली नाही. विवेक पाटील यांनी केलेला भष्टाचार पाठीशी घालण्याचे काम त्यांनी व त्यांच्या पक्षाने सोयीनुसार केले. या घोटाळ्याचा पैसा निवडणुकीसाठी वापरला गेला असल्याचा सूरही जनमानसात उमटला आहे. (पान २ वर..)



# चिरनेरमध्ये आमदार महेश बालदींचा प्रचार



**उरण : वार्ताहर**

उरण मतदारसंघात भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी, आरपीआय विधानसभा महायुतीचे उमेदवार आमदार महेश बालदी यांच्या प्रचारात शेवटच्या दिवशी रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रचार रॅलीत महिलांसह तरुणवर्गाचा मोठा प्रतिसाद मिळाला. शेवटच्या दिवशीही महायुतीचे कार्यकर्ते चिरनेरमध्ये विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने आमदार महेश बालदी यांचा जोमाने विजयी करण्याचे लक्ष ठेवून प्रचार करत होते. या वेळी महायुतीच्या कार्यकर्त्यांनी चिरनेरमधील मतदारांशी संवाद साधून आपल्या परिसरात ज्या वेगाने विकासाची कामे झाली. त्याच वेगाने पुढील काळातही विकासकामे सुरू राहण्यासाठी आमदार महेश बालदी यांना पुन्हा एकदा विजयी करा, असे आवाहन कार्यकर्त्यांनी केले.

प्रचाराच्या वेळी सुशांत पाटील, संजीवकुमार भगत, प्रतीक गोंधळी, संजय गोंधळी, रमेश फोफेरकर, कुंदन परदेशी, समीर डुंगीकर, नंदकुमार चिरनेरकर, आशिष भगत, योगेश खारपाटील, महेंद्र ठाकूर, मिथुन पाटील, प्रकाश गोंधळी, अनिकेत गोंधळी, सुजित पाटील, संकेत भगत, अतिश परदेशी, मयूर म्हात्रे, समीर म्हात्रे, नितेश गोंधळी, सौरभ परदेशी तसेच अन्य पदाधिकारी आणि महिला कार्यकर्त्याही उपस्थित होत्या.

# पिस्तूल, मॅगझीन, जिवंत राउंडसह रोख रक्कम जप्त

## शेडूंग टोलनाका येथे धडक कारवाई

**पनवेल : वार्ताहर**



विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४साठी १५ ऑक्टोबर २०२४ पासून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. पनवेल १८८ विधानसभा मतदारसंघ, निवडणूक विभाग अंतर्गत आचारसंहिता पथकांतर्गत स्थिर सर्वेकूषण पथक क्र. ०८ (८८५१-०८, पथक) ने पुणे ते जुने मुंबई हायवेच्या दिशेने जाणाऱ्या शेडूंग चेक पोस्ट येथे रोडवरून जाणाऱ्या एमजी ग्लोस्टर कंपनीची सिल्व्हर ग्रे रंगाची चार चाकी गाडीस थांबवून तपासणी केली असता, त्या गाडीत असलेल्या काळ्या रंगाच्या बॅगमध्ये एक पिस्टल, २ मॅगझीन, १२ जिवंत राउंडसह दोन लाख तेहतीस हजारपाचशे पन्नास रुपयांची रोख रक्कम आढळून आली.

ही रक्कम संशयास्पद असल्याने स्थिर सर्वेक्षण पथक क्र.०८मार्फत रोख रक्कम जप्त करुन कोषागार कार्यालय पनवेल येथे जमा करण्यात आली व जप्त करण्यात आलेले अग्नीशस्त्र पनवेल तालुका पोलीस ठोणे यांच्याकडे पुढील तपास व कार्यवाहीसाठी सुपूर्त करण्यात आले. कारवाई पनवेल विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी पवन चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

या कारवाई वेळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी विजय पाटील, आचारसंहिता पथक प्रमुख भारत राठोड, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, संदीप कराड, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, संजय भालेराव, सहाय्यक खर्च निरिक्षक, विजय फासे, सहाय्यक खर्च निरिक्षक, संजय आपटे, आचारसंहिता पथक प्रमुख महेश पांढरे, आचार संनियंत्रण अधिकारी, शरद गिते, आचारसंहिता पथक सहाय्यक प्रमुख जी. एस. बहिरम, सहा.समन्वयक आचारसंहिता कक्ष, दिनेश भोसले, तुषार म्हात्रे, नितेश चिमणे, आशा डोळस, तसेच स्थिर सर्वेक्षण पथक क्र. ०८ पथकाचे प्रमुख किरण भगत, सहा.पथक प्रमुख, देवा केसला, खारघर पोलीस ठाण्याचे शिपाई गोपाल चव्हाण, युवराज दिवे उपस्थित होते.

# अधिकाऱ्यांनी बजावला मतदानाचा हक्क

**अलिबाग : प्रतिनिधी**



रायगडचे जिल्हाधिकारी डॉ. किशन जावळे, रायगड पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी सोमवारी (दि.१८) टपाली मतदान करून आपला मतदानाचा हक्क बजावला.

महाराष्ट्रात २० नोव्हेंबर रोजी विधानसभेच्या निवडणुकीसाठी मतदान होणार आहे. जे अधिकारी आपल्या मतदान संघाच्या बाहेर कार्यरत आहेत. ते मतदानाचा हक्क बजावण्याच्या हक्कापासून वंचित राहू नयेत यासाठी निवडणूक आयोगाने सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. त्यानुसार हा फॉर्म भरून मतदाराची माहिती मागविण्यात येते. ही माहिती मिळाल्यानंतर मतपत्रिका पाठवली जाते. त्यानुसार या मतपत्रिकेवर टपाली मतदान करून ही मतदान पत्रिका संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात येते.

असे टपाली मतदान करता यावे यासाठी मतदान सुविधा केंद्र तयार केली जातात.

# आमदार महेश बालदींच्या प्रचार रॅलीने विजय पक्का -सुधीर ठोंबरे

**चौक : प्रतिनिधी**



उरण विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार महेश बालदी यांच्या प्रचार रॅलीला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद त्यामुळे त्यांचा विजय नक्की झाला आहे, असे भाजपचे उत्तर रायगड उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे आणि खालापूर मंडळ अध्यक्ष प्रवीण मोरे यांनी सांगितले.

महायुतीचे आणि भारतीय जनता पक्षाचे उमेदवार महेश बालदि यांची चौक वावर्ले ते आपटा पुढे उरण अशी बाईक रॅली काढण्यात आली. वावर्ले येथुन निघालेल्या बाईक रॅलीला प्रचंड मोठा प्रतिसाद मिळाला हे चित्र बघून विरोधकांच्या पाया खालची वाळू सरकली असून आमदार महेश बालदी यांचा विजय नक्की झाल्याचे भारतीय जनता पक्षाचे उत्तर रायगड उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे व खालापूर मंडळ अध्यक्ष प्रवीण मोरे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. सद्या चौक परिसरात भाजपत मोठी इंनकमिंग सुरू आहे. येथील नेते सुधीर ठोंबरे आणि प्रवीण मोरे यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेऊन अनेकांनी भाजपत प्रवेश केला असून अनेक पक्षातील कार्यकर्ते प्रवेशाच्या वाटेवर आहेत.

# मतदान यंत्रांसाठी २६७ बसेस अधिग्रहित

**अलिबाग : प्रतिनिधी**

विधान सभेसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान होत आहे. यासाठी मतदान यंत्रे ने आण करण्यासाठी एस टी बसेस वापरल्या जाणार आहेत. यामुळे दोन दिवस एसटी बस सेवेवर मोठा परिणाम होणार आहे.

मतदान यंत्रांचीने आण करण्यासाठी तसेच अधिकारी, कर्मचाऱ्यांची वाहतूक करण्यासाठी रायगड जिल्हा निवडणूक विभागाने एस टी बसेस तसेच खाजगी वाहने अधिग्रहित केली आहेत. जिल्ह्यातील आठ आजारांमध्ये ३१० लाल परी बसेस आहेत. त्या पैकी २६७ बसेस या कामासाठी अधिग्रहित करण्यात आल्या आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील प्रवासी वाहतूक सेवेवर १९ व २० नोव्हेंबर रोजी मोठा परिणाम होणार आहे.

ज्या बसेस शिल्लक राहतील त्यांच्या करवी स्थानिक फेऱ्या सुरू राहतील. मात्र बसेस कमी असल्यामुळे स्थानिक तसेच लांब पल्ल्याच्या फेऱ्या रद्द कराव्या लागणार आहेत. शिवशाही बसेसच्या फेऱ्या नियमित सुरू राहतील, अशी माहिती एसटी चे विभाग नियंत्रक दीपक घोडे यांनी दिली.

# खोपोली नगर परिषदेची मतदान जनजागृतीसाठी रॅली

**खोपोली : प्रतिनिधी**



मतदान जनजागृतीसाठी नगर परिषद प्रशासन यांनी शहराच्या विविध भागात जनजागृतीसाठी रॅलीचे आयोजन केले होते, या रॅलीत जनता विद्यालय शिशु मंदिरच्या विद्यार्थ्यांनी; त्याचबरोबर शिक्षकांनीही सहभाग घेतला.

मुख्याधिकारी पंकज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या जनता विद्यालय विविध शाखेतील सुमारे पाचशे विद्यार्थी व नगर परिषद कर्मचारी यांनी यात भाग घेतला होता.

# सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात मतदान जनजागृती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



उलवे येथील सौ.शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात विद्यार्थ्यांना मतदानाचे महत्त्व कळावे, विद्यार्थ्यांना मतदान प्रक्रिया त्याचा अर्थ समजावा व त्यांनी पालकांना मतदानासाठी प्रवृत्त करावे यासाठी मतदान जागृती हा कार्यक्रम विद्यालयात राबविण्यात आला.

या कार्यक्रमात प्रत्यक्ष मतदान प्रक्रिया विद्यार्थ्यांनी पथनाट्यातून सादर केली. विद्यालयातील इयत्ता नववीची विद्यार्थ्यीनी वैभवी सोमासे हिने संविधाना द्वारे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी मिळवून दिलेला मतदानाचा अधिकार विद्यार्थ्यांना आपल्या भाषणातून समजावून सांगितला तसेच इच्छा वानखेडे या विद्यार्थिनीने मतदान जनजागृती यासाठी स्वतःचे प्रभावी विचार मांडले व मतदान अधिकार पार पाडण्यासाठी पालकांना जाग्रृत करू, असे आश्वासन दिले.

विद्यालयातील उपशिक्षिका वेदांगी म्हात्रे, पल्लवी पवार, विशाखा गावंड, आशा कसपटे यांनी या पथनाट्यासाठी विशेष सहकार्य केले व उत्कृष्टपणे हा कार्यक्रम विद्यालयात राबविण्यात आला.

पथनाट्यात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांची निवड त्यांची स्क्रिप्ट आणि त्यांची वेशभूषा यासाठी विद्यालयातील सांस्कृतिक विभाग प्रमुख व विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ ज्योत्स्ना ठाकूर मॅडम यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यानंतर विद्यार्थ्यांना मतदान जागृतीचे फॉर्म वाटप करण्यात आले व पालकांना या प्रक्रियेची माहिती देऊन मतदान करण्यास जागृत करावे, असे आवाहन या वेळी मुख्याध्यापिका ज्योत्स्ना ठाकूर यांनी केले.

## पान १ वरुन

### आमदार प्रशांत ठाकूर पनवेलचे विकासपुरुष

या सभेला पनवेल महापालिकेच्या माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, स्थायी समितीचे माजी सभापती संतोष शेट्टी, माजी नगरसेवक समीर ठाकूर, आरपीआयचे जिल्हाध्यक्ष प्रभाकर कांबळे, महिला मोर्चाच्या पनवेल शहर अध्यक्ष राजश्री वावेकर, भाजप दक्षिण भारतीय सेलचे महाराष्ट्र प्रदेश सहसंयोजक रमेश नायर, उत्तर रायगड जिल्हा सहसंयोजक जयेश नांबियार, महिला मोर्चा उपाध्यक्ष यमुना प्रकाशन, सुषमा नायर, लीना प्रेमचंद, माया नायर, विद्या श्रीकुमार, जय प्रकाश, रामकृष्णन यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### उरणच्या रेल्वेची कनेक्टिव्हिटी अधिक वेगाने वाढणार –रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव

उरण शहरात तत्कालीन पेट्रोलियममंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करून उरण शहरात पाईपलाईनने गॅसपुरवठा करण्याची योजना कार्यान्वित केली. त्यानंतर संपूर्ण तालुक्यात पाईपने गॅसपुरवठा करणारी वाहिनी साकारण्यात येईल, असे अभिवाचन देऊन आमदार महेश बालदी म्हणाले की, उरणमध्ये रेल्वेसेवा सुरू केली. आता येथून मुंबई, ठाणे, बोरीवली व इतर ठिकाणी थेट रेल्वेगाडी सुरू व्हावी यासाठी रेल्वेमंत्र्यांकडे पाठपुरावा केला जाईल. दुर्बल घटकांसाठी पक्क्या घरांची योजना कार्यान्वित करणार आहे. नवी मुंबई विमानतळामध्ये स्थानिकांना आणि प्रकल्पग्रस्तांनाच घेतले जाईल. जनतेची विकासकामे करणे हाच आमचा मसुदा असून आम्ही विकासात राजकारण करीत नाही. विरोधी दोन्ही उमेदवार मोठ्या फरकाने मागे राहतील आणि विजयाचा गुलाल आपल्याच डोक्यावर पडेल.

या प्रचार सभेला आरपीआयचे जिल्हाध्यक्ष प्रभाकर कांबळे, प्रकल्पग्रस्तांचे झुंझार नेते दिवंगत दि.बा. पाटील यांचे पुत्र अतुल पाटील, भाजप तालुका अध्यक्ष रवी भोईर, मेघनाथ तांडेल, शिवसना तालुका प्रमुख महेंद्र पाटील, संजय गायकवाड आदींनी आपल्या मनोगतातून कार्यकर्त्यांना संबोधित केले. प्रास्ताविक भाजप जिल्हा चिटणीस चंद्रकांत घरत यांनी केले.

या वेळी उरण मतदारसंघातील कार्यकर्त्यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. त्यांचे स्वागत करण्यात आले. या सभेला माजी जि.प. सदस्य विजय भोईर, माजी नगराध्यक्ष सायली म्हात्रे, माजी उपनगराध्यक्ष जयविन कोळी, भाजप शहर अध्यक्ष तथा माजी नगरसेवक कौशिक शाह, महालण विभाग अध्यक्ष महेश कडू, आरपीआयचे तालुका अध्यक्ष संजय गायकवाड, कामगार नेते सुरेश पाटील, भूपेंद्र घरत, राजेश ठाकूर, सुनील पेडणेकर, राजेंद्र खारपाटील, हितेश शाह, मनन पटेल, दिनेश ठक्कर, हस्तीमल मेहता, अजित भिंडे, मनोहर सहतिया, निलेश कदम, मदन कोळी, राजेश कोळी, रवी कुलकर्णी, महेश घरत, शशी पाटील, मुकुंद गावंड, जीवन गावंड, धनाजी ठाकूर, समिता दत्ता ठाकूर, भार्गव पाटील, मकरंद पोतदार, मनोज ठाकूर, सागर मोहिते, सविन म्हात्रे, देवेंद्र घरत, निता बालदी, महिला मोर्चा तालुकाध्यक्ष राणी म्हात्रे, जिल्हा उपाध्यक्ष संगीता पाटील, भेंडखळ ग्रामपंचायतीच्या सरपंच मंजिता पाटील, बांधपाडा ग्रामपंचायतीच्या सरपंच विशाखा ठाकूर, रजनी कोळी, सुषमा म्हात्रे, निर्मला घरत, राधिका बालदी, शुभम बालदी यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### नैना प्रकल्पासाठी जयंत पाटील आग्रही; शेकापच्या दुटप्पी भूमिकेचा पर्दाफाश

शिक्षक आमदार म्हणून सहा वर्षे बाळाराम पाटील निवडून आले. या काळात त्यांनी लोकांचेच काय, पण शिक्षकांचेही प्रश्न सोडवले नाहीत. पनवेलच्या विकासासाठी निधी आणला नाही. त्यामुळे निवडणुकीत त्यांचा दारूण पराभव झाला. ते शिक्षक आमदार असताना महाविकास आघाडीची अडीच वर्षे राज्यात सत्ता होती, मात्र त्या वेळीदेखील त्यांनी पनवेलच्या विकासासाठी तसूभरही काम केले नाही. कोणतेही विधायक काम न करता लोकांची माथी भडकवण्याचे काम मात्र त्यांनी चोखपणे केले. त्याचे उदाहरण नैना प्रकल्प आहे. महाविकास आघाडीची सत्ता असताना बाळाराम पाटील यांनी या प्रश्नांना का बगल दिली, असा सवाल जनतेमधून विचारला जात आहे.

पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रसारमाध्यमांना प्रतिक्रिया देत शेतकऱ्यांचे समाधान होईपर्यंत नैना प्रकल्पाची एक वीटसुद्धा रचू देणार नाही याचा पुनरूच्चार केला आहे. दुसरीकडे शेकापचे बाळाराम पाटील यांनी फक्त निवडणुकीसाठीच नैना प्रकल्पाचा मुद्दा पुढे करून मतदारांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला, हे त्यांच्याच पक्षाचे प्रमुख जयंत पाटील यांनी उरणमध्ये केलेल्या भाषणातून स्पष्ट झाले आहे.

# 'सीकेटी'त विज्ञान प्रदर्शन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विज्ञानाचे दैनंदिन जीवनातील महत्त्व या विषयावर आधारित विज्ञान प्रदर्शन सोमवारी (दि. १८) चांगू काना ठाकूर (सीकेटी) मराठी माध्यमिक विद्यालयात विज्ञान मंडळातर्फे आयोजित करण्यात आले.

या प्रदर्शनाच्या उद्घाटनाला जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव एस.टी.गडदे, इंग्रजी माध्यमाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, सीकेटी ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य प्रशांत मोरे, इंग्रजी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, पर्यवेक्षिका वैशाली पारधी, मराठी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर सर, उच्च माध्यमिक विभागाचे पर्यवेक्षक अजित सोनवणे, मराठी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे तसेच पर्यवेक्षक कैलास म्हात्रे इत्यादी प्रमुख पाहुणे उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी स्व मेहनतीने नैसर्गिक शेती, आपत्ती व्यवस्थापन, वाहतूक दळणवळण, संसाधन व्यवस्थापन, कचरा व्यवस्थापन अशा विविध विषयांवर आधारित चल प्रतिकृती तयार केल्या होत्या. संस्थेचे सचिव गडदे यांनी मुलांच्या प्रतिकृतींचे खास कौतुक केले. वाहनातून निघणाऱ्या धुरापासून निळनिर्मिती करणे हा विषय प्रदर्शनातील सर्वांच्या आकर्षणाचे केंद्र ठरले.

सर्व प्रतिकृतीचे परीक्षण जितेंद्र मिस्त्री (प्राध्यापक उच्च माध्यमिक विभाग) यांनी केले. फलकलेखन हेमंत कोळी, निवेदन दिवेकर, सहकार्य तनुजा मोरे, विद्या मावलीकर, मिलन म्हात्रे, वसुधा ग्खरमाटे, वंदना कोळेकर, सुवोध दिवेकर केले. इतर सर्व शिक्षक शिक्षकेतर कमचाऱ्यांनी सहकार्य केले.

## दुखवटा

### शशिकांत गोतावडे



**धाटाव :** तालुक्यातील प्रख्यात मराठी व्यावसायिक शशिकांत सायकल मार्टचे मालक शशिकांत गोतावडे (वय ७०) यांचे रविवारी (दि.१७) निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, मुली, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. कै. शशिकांत गोतावडे पत्रकार राजेंद्र जाधव यांचे ते सासरे असून त्यांचा दशक्रिया विधी मंगळवारी (दि.२६) पांडुरंग घाट रोहा येथे तर उत्तरकार्य शुक्रवारी (दि.२९) भुवनेश्वर रोहा येथे होणार आहे.

### सुभाष पाटील



**उरण :** नगर परिषदेचे माजी कर्मचारी तथा सामाजिक कार्यकर्ते सुभाष पाटील (वय ६६) यांचे रविवारी (दि.१०) निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, चार मुले, सहा नातू असा परिवार आहे. सुभाष पाटील यांनी ४० वर्षे त्यांनी उरण नगर परिषदेमध्ये सेवा केली. कामगार युनियनचे उपाध्यक्षपदी त्यांनी भूषवले होते. त्यांचा दहावा विधी मंगळवारी (दि.१९) तर बारावी विधी गुरुवारी (दि.२१) उरण धुळीवाडा येथे होणार आहे.

### दयानंद राऊळ



**अलिबाग :** आवास गावातील समाजसेवी व्यक्तीमत्व दयानंद पांडुरंग राऊळ (वय ५४) यांचे शनिवारी (दि.९) निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी व एक मुलगी असा परिवार आहे. कै. दयानंद राऊळ यांना संगीत भजन क्षेत्राची खूप आवड होती. गेली अनेक वर्षे श्री सिध्देश्वर प्रासादिक संगीत भजन मंडळ सुरू ठेवण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे.

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्यामुळे कुष्ठरुग्णांना मिळाला विशेष भत्ता

**पनवेल : प्रतिनिधी**

कुष्ठरुग्ण बांधवांना त्यांची दिवाळी आनंदात जावी यासाठी प्रत्येकी चार हजार रुपये विशेष अनुदान पनवेल महापालिकेतर्फे देण्यात आले. त्यामुळे राज्यात कुष्ठरोग बांधवांना असे अनुदान देणारी पनवेल महापालिका ही पहिलीच महापालिका ठरली असून याचे श्रेय आमदार प्रशांत ठाकूर यांनाच असल्याचे कुष्ठरुग्ण बांधवांनी सांगितले.



पनवेल रेल्वे स्टेशनच्या फलाट क्रमांक १च्या बाजूला श्री गणेश कुष्ठरुग्ण वसाहत आहे. त्यामध्ये २७ नोंदणीकृत कुष्ठरुग्ण बांधव आहेत. माजी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ यांनी त्यांना औषोधोपचारासाठी भत्ता देण्याची मागणी आमदार प्रशांत ठाकूर व महापौरांकडे लेखी केली होती. आमदार प्रशांत ठाकूर मार्गदर्शनाखाली तत्कालीन महापौर डॉ. कविता चौतमोल व सभागृह नेते परेश ठाकूर यांनी पनवेल महापालिकेतर्फे त्यांना दरमहा औषोधोपचारासाठी चार हजार रुपये भत्ता देण्याबाबत २४ मे २०२२च्या सर्व साधारण सभेत ठराव क्रमांक ४६९ मंजूर केला होता. त्यासाठी १३ लाख ४४ हजार रुपये आर्थिक व प्रशासकीय खर्चाला मान्यता देण्यात आली होती. सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात कुष्ठरोग कल्याण निधीसाठी एक कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

आमदार प्रशांत ठाकूर यांचे मार्गदर्शनाप्रमाणे सभागृह नेते परेश ठाकूर महापौर डॉ. कविता चौतमल यांनी लक्ष देऊन समाजापासून वंचित असलेल्या कुष्ठ रुग्णांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले. कुष्ठरोग बांधवांची दिवाळी आनंदातजावी यासाठी त्यांना एक लाख आठ हजार रुपये दिवाळीसाठी वाढीव भत्ता देणे वरील तरतुदीमुळे शक्य झाले. याशिवाय महानगर पालिकेने या वसाहतीला विजेची सोय करून दिली. संजय गांधी निराधार योजनेचा लाभ दिला आहे.

> **या वसाहतीत २४ कुटुंबात ८५ जण राहत आहेत. त्यामध्ये १० रुग्णांना जखमा आहेत. त्यांना रोज मलमपट्टी करावी लागते. त्यासाठी लागणारी औषधे, मलम-पट्टी आणि ड्रेसिंग करण्यासाठी त्यांना दवाखान्यात लांब जावे लागत होते. त्याचा खूप त्रास व्हायचा त्यांनी मला ही माहिती दिल्यावर मी आमदार साहेबांना सांगितल्यावर सभागृह नेते परेश ठाकूर यांना सांगून त्या ठिकाणी दर १५ दिवसांनी तेथे ड्रेसिंगसाठी परिचारिका पाठवण्यास सुरुवात केली.**
> **-ॲड. मनोज भुजबळ,**
> **माजी नगरसेवक**

> **आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मुळे आम्हाला पिवळी रेशन कार्ड मिळाली संजय गांधी निराधार योजनेचा लाभ दिला आहे. या वसाहतीतून जाण्यासाठी चांगला रस्ता नव्हता आम्हाला जखमा असल्याने चिखलातून दवाखान्यात जाताना त्रास व्हायचाआमदारांना आमची अडचण सांगताच त्यांनी येथील रस्ता करून दिला. आम्हाला औषध व मलम पट्टीची सोय करून दिली. कोरोनाच्या काळात दिवाळीत आम्हाला रेशन दिले.**
> **-प्रकाश पाटेकर, श्री गणेश कुष्ठरोग वसाहत**

# महायुतीची संपूर्ण पनवेल मतदारसंघात झंझावाती रॅली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल मतदारसंघाचे विकासपुरुष आमदार प्रशांत ठाकूर यांचा विजयाची घोडदौड कायम ठेवण्यासाठी महायुतीचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी सर्व ताकद पणाला लावून संपूर्ण मतदारसंघात प्रचार केला.



या अंतर्गत पनवेल विधानसभा मतदारसंघातील कळंबोली, कामोठे, खांदा कॉलनी, नवीन पनवेल, पनवेल, खारघर, नेरे, पाली देवद जिल्हा परिषद, कोन, पळस्पे, विचुंबे पंचायत समिती विभागात भव्य बाईक रॅली रविवारी (दि.१७) काढण्यात आली होती. बाईक हजारो कार्यकर्त्यांनी सहभागी होत भाजपचा झेंडा फडकावून आमदार प्रशांत ठाकूर यांना विजयी करण्याचे आवाहन मतदारांना केले.

या बाईक रॅलीमध्ये भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, शिवसनेचे पनवेल जिल्हाध्यक्ष रामदास शेवाळे, जिल्हा परिषदेचे माजी सदस्त अमित जाधव, राजेंद्र पाटील, प्रल्हादे केणी, भूपेंद्र पाटील, विचुंबेचे सरपंच प्रमोद भिंगारकर, पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, किशोर सुरते, योगेश लहाने, बळीराम पाटील, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, तालुका सरचिटणीस प्रल्हाद केणी, माजी नगरसेवक हरेश केणी, विकास घरत, विजय चिपळेकर, डॉ. अरुणकुमार भगत, अमर पाटील, बबन मुकादम, गोपिनाथ भगत, राजू शर्मा, युवा नेते हॅप्पी सिंग, दिनेश खानावकर, महिला मोर्चा अध्यक्षा वनिता पाटील, साउथ इंडियन सेल्सचे सुजित पुजारी, कामोठे मंडळ सरचिटणीस हर्षवर्धन पाटील, शिवशेना शहराध्यक्ष सुनील गोवारी, राष्ट्रवादीचे अध्यक्ष किशोर मुंडे, सुकापूर अध्यक्ष राजेश पाटील, कळंबोली शहर अध्यक्ष रविनाथ पाटील, कामोठे शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, राजेश गायकर, युवा मोर्चा तालुका सरचिटीस विश्वजीत पाटील, कामोठे शहर अध्यक्ष तेजस जाधव, मयूर मोहिते आदी उपस्थित होते.



## निवडक

### दोन दुचाकींचा अपघात; एकाचा मृत्यू

**पनवेल :** वेगाने मोटरसायकल चालविल्याने झालेल्या दोन मोटरसायकलच्या अपघातात एकाचा मृत्यू झाल्याची घटना पनवेल परिसरात घडली आहे. आर-५ करंजाडे येथील रस्त्यावर ॲक्टीव्हा मोटरसायकलवरील चालकाने हिरो कंपनीच्या स्प्लेंडर मोटरसायकलीस धडक मारून झालेल्या अपघातात सुरज विश्वकर्मा यांचा मृत्यू झाला आहे. तर इतर तिघे जण जखमी झाले आहेत. या अपघाताची नोंद शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### पनवेल 'उबाठा'ची मार्गदर्शन बैठक



**पनवेल :** शिवसेना जिल्हाप्रमुख रायगड शिरीष घरत यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहरातील शाखेमध्ये प्रचार यंत्रणेबद्दल व बूथ प्रमुख (बीएलए) नेमणुकासंदर्भात आढावा बैठक पार पडली. या वेळी रायगड जिल्हा समन्वयक व निरीक्षक अनिल चव्हाण, जिल्हा सल्लागार शिरीष बुटाला, उपजिल्हाप्रमुख रामदास पाटील, उपजिल्हाप्रमुख भरत पाटील, महानगर समन्वयक दिपक घरत, युवासेना सहसचिव अवचित राऊत, मधू पाटील, शहर प्रमुख प्रवीण जाधव, शहर संघटिका अर्चना कुळकर्णी सर्व पुरुष पदाधिकारी, महिला आघाडी पदाधिकारी, युवासेना व युवतीसेना पदाधिकारी आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# आमदार प्रशांत ठाकूर यांना तीन हजारांचे मताधिक्य देणार -अनेश ढवळे

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलचा विकास करणारे कार्यकुशल आमदार प्रशांत ठाकूर यांना विधानसभा निवडणुकीत तीन हजारांचे मताधिक्य देऊन बहुमताने निवडून आणणार, असा ठाम विश्वास भाजपचे पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे यांनी प्रचारादरम्यान व्यक्त केला.

प्रचारादरम्यान ढवळे यांनी सांगितले की, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या समाजकारणाचा वारसा घेऊन आमदार प्रशांत ठाकूर सर्व समाजाचा विकास करीत आहेत. त्यांच्या या कार्याची पोचपावती म्हणजे आज त्यांना सर्व समाजाकडून मिळालेल्या पाठिंबापत्रातून दिसून येत आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांनी सर्व समाज बांधवांना न्याय देण्याचे काम केले आहे.

पनवेलमधील मुलभूत सोयीसुविधा आमदार प्रशांत ठाकूर यांनी शासनदरबारी मांडून मार्गी लावल्या आहेत. यासोबत आरोग्य, शिक्षण, उद्याने, पर्यावरण, सांस्कृतिक अशा सर्वच क्षेत्रामध्ये त्यांनी आपले महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. शासनाच्या प्रत्येक योजना पनवेल मतदारसंघांत आण्याचे काम आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले आहे. या योजना कायमस्वरुपी सुरू ठेवण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांना पुन्हा एकदा आमदार बनवायचे आहे. त्यामुळे आपण सर्वांनी त्यांना येत्या २० तारखेला प्रचंड मताधिक्य मिळवून द्यावे, असे आवाहन ढवळे यांनी या वेळी केले.

पनवेल विधानसभा मतदारसंघाचा विकास करणारे कार्यतत्पर आमदार प्रशांत ठाकूर यांना विजयी करण्यासाठी महायुतीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनी संपूर्ण मतदारसंघ पिंजून काढला आहे. समाजाचा हित जपणारा पक्ष म्हणून भारतीय जनता पक्ष ओळखला जातो. त्यामुळे सर्व समाजाच्या हिताच्या योजना यापुढेही सुरू राहण्यासाठी महायुतीचे सरकार कायम राहणे महत्त्वाचे आहे, असेही ढवळे यांनी प्रचार करतेवेळी म्हटले.



# बंजारा समाजाचा स्नेहमेळावा
## आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महायुती सरकारने बंजारा समाजाला योग्य सन्मान दिला आहे. त्यामुळे जिते बंजाराचा सन्मान तिथे बंजाराचे मतदान असे सांगून या निवडणुकीत बंजारा समाज आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पाठिशी आहे, असे प्रतिपादन पोहरादेवी धर्मपिठाधीधर महंते जितेंद्र महाराज यांनी रविवारी (दि.१७) केले.

संत सेवालाल महाराज लमाण आणि बंजारा तांडा समृद्धी योजने अंतर्गत आयोजित बंजारा स्हेनमेळावा कळंबोलीमध्ये रविवारी झाला. या मेळाव्याला भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी, आरपीआय आणि मित्रपक्ष महयुतीचे अधिकृत उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट दिली. या वेळी महंते जितेंद्र महाराज यांनी सांगीतले की, महायुती सरसकारने त्यांच्या कार्यकाळात बंजारा समाजाला योग्य सन्मान दिला. त्यामुळे समाज महायुती आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पाठीशी खंबीर आहे. त्यामुळे तुम्ही भरघोस मतांनी निवडून याल अश्या शुभेच्छ दिल्या.

या स्नेहमेळाव्याला भाजपचे कामोठे शहर अध्यक्ष रविनाथ पाटील, माजी नगरसेवक बबन मुकादम, अमर पाटील, राजू शर्मा, भाजपनेते बबन बारगजे, अमर ठाकूर आदी उपस्थित होते.

## भाजप नेते अरुणशेठ भगत यंदा वाढदिवस साजरा करणार नाही



**पनवेल :** भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांचा वाढदिवस येत्या २२ नोव्हेंबर रोजी आहे. ते यंदा आपला वाढदिवस साजरा करणार नाहीत.

पनवेल, उरणमध्ये त्यांचा मोठा चाहतावर्ग आहे. सर्वपक्षीय नेते पदाधिकारी, कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी आवर्जून येत असतात, परंतु या वर्षी कुणीही शुभेच्छा देण्याकरिता येऊ नये. तुमचे प्रेम व आपुलकी सदैव माझ्यासोबत राहिल, असे अरुणशेठ भगत यांनी आपल्या संदेशात म्हटले आहे.

# आमदार महेश बालदींना विजयी करा -प्रवीण घासे

**उरण : वार्ताहर**

उरण विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीत आमदार महेश बालदी यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन भाजपा उरण पूर्व विभाग युवा मोर्चा अध्यक्ष प्रवीण घासे यांनी केले आहे.

उरण विधान सभा मतदारसंघातील कार्यसम्राट आमदार म्हणून ओळख असणारे उरण, पनवेल खालापूर मतदार संघात विकास कामे करून समाजातील शेवटच्या घटकापर्यंत ते पोहचविण्याचे कसब असणारे व्यक्तिमत्व म्हणजे आमदार महेश बालदी. त्यांनी तरुण वयातच राजकीय क्षेत्रात पदार्पण झालेल्या या नेतृत्वाने जमेल तेथे हाथ जोडून अन्यथा वेळ पडल्यास संघर्ष करून या संघर्ष योध्याने जनसामान्यांचे काम अविरत पणे सुरू ठेवले.



या दमदार कार्य शैलीने एक सामान्य भारतीय जनता पक्षाचा कार्यकर्ता चार वेळा उरण नगर परिषदेचा नगरसेवक, त्यानंतर नागराध्यक्ष, देशातील पहिल्या क्रमांकावर असलेल्या जेएनपीए बंदराचे विश्वस्त आणि कार्यकर्त्यांच्या आशीर्वादावर आता उरण विधान सभा मतदार संघावर मागील पाच वर्षे आमदारकीचा प्रवास पूर्ण केला आहे. उरण पनवेल खालापूरसह संपूर्ण रायगड जिल्ह्यात भारतीय जनता पक्ष वाढविण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली असून जाती धर्म निरपेक्ष विचार आणि विकासाच दृष्टिकोन या मुळे जाती धर्माच्या नागरिकांनी त्यांना साथ दिली आहे. प्रत्येकाला मदत करणारा आणि हाकेला धावून जाणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख निर्माण झाल्याने केंद्र सरकार ते राज्य सरकार मधील विविध मंत्र्यांचे त्यांच्या समवेत जिव्हाळ्याचे संबंध प्रस्थापित आहेत.

उरण मतदार संघात विकास प्रकल्प आणि त्याला लागणाऱ्या परवानग्या व विकास निधी खेचून आणून ते पूर्णत्वास नेण्याची त्यांची खासियत सर्वांनाच ठाऊक आहे. त्यांच्या या कार्य कुशल पद्धतीमुळे आणि खंबीर नेतृत्वामुळे उरण पनवेल आणि खालापूर येथील झालेला अभूतपूर्व विकास यामुळे होऊ घातलेल्या उरण विधान सभा निवडणुकीत आमदार महेश बालदी यांना पुन्हा एकदा मोठ्या मतांधिक्याने विजयी करण्याचे आवाहन भाजप उरण पूर्व विभाग युवा मोर्चा अध्यक्ष प्रवीण घासे यांनी केले आहे.

# आमदार प्रशांत ठाकूर यांना प्रभाग २०मधून मोठी आघाडी मिळणार -तेजस कांडपिळे

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिका हद्दीतील प्रभाग समिती 'ड' मधील प्रभाग २० मधील पोदी स्मशानभूमीच्या दुरुस्तीसह ३१ कोटी ६० लाखाच्या अंतर्गत रस्ते, गटारे, मल:निस्सारण वाहिन्या व मैदान विकसित करण्याची कामे आमदार प्रशांत ठाकूर यांचे पाठपुराव्यामुळे झाली. याशिवाय कोरोना काळात त्यांनी पोदी, तक्का, काळुंद्रे व भिंगारी येथे आठवड्यातून एकदा कोरोना लसीकरणाची सोय करून दिली होती. त्यामुळे या प्रभागातून त्यांना मोठी आघाडी मिळण्याची खात्री माजी नगरसेवक तेजस कांडपिळे यांनी व्यक्त केली.



प्रभाग २०मधील पोदी स्मशानभूमीत अनेक खड्डे पडले होते. बाजूच्या शेडच्या भिंती खराब झाल्या होत्या. त्यामुळे नागरिकांनी स्थानिक नगरसेवक तेजस कांडपिळे यांचेकडे त्या दुरुस्त करण्याची मागणी केल्यावर त्यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आयुक्तांकडे पत्र देऊन पोदी स्मशान भूमीच्या दुरुस्तीचे काम पूर्ण करण्यात आले. याशिवाय प्रभाग 'ड' मध्ये विविध विकासाची कामे आमदार प्रशांत ठाकूर व सभागृह नेते परेश ठाकूर मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

या मध्ये अंतर्गत रस्ते, गटारे, मल:निस्सारण वाहिन्या, पोदी व तक्का गाव येथील अंतर्गत गटार, मल: निस्सारण वाहिन्या व भिंगारी गावातील गटारांचे बांधकाम पूर्ण केले.

कोरोना काळात लस घेण्यासाठी यूपीएचसी -३ मध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी होत होती. टोकन घेण्यासाठी पहाटे पासून रांग लागत असल्याने नोकरी करणाऱ्यांना व ज्यांचे पोट हातावर आहे अशांना लस मिळणे अवघड झाले होते. नगरसेवक मनोज भुजबळ व तेजस कांडपिळे यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका आयुक्तांना पत्र देऊन पोदी, तक्का, काळुंद्रे व भिंगारी येथे लसीकरण केंद्र सुरू करण्याची मागणी केली होती.

सभागृह नेते परेश ठाकूर यांनीही त्याबाबत आयुक्तांकडे पाठपुरावा केल्याने पोदीवरील ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले शाळेत लसीकरण केंद्र सुरू करण्यात आले होते. त्यामुळे येथील नागरिकांनी प्रशांत ठाकूर यांनाच पुन्हा निवडून देण्याचा निर्धार केला असल्याने ते प्रभाग २० मध्ये मोठी आघाडी घेतील, असा विश्वास तेजस कांडपिळे यांनी व्यक्त केला.

# 'सीकेटी'च्या विद्यार्थ्यांची अग्निशमन केंद्राला क्षेत्रभेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालय मराठी प्राथमिक विभागाच्या वतीने गुरुवारी (दि.१४) इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांची सिडको अग्निशमन केंद्र, नवीन पनवेल येथे क्षेत्रभेट देण्यात आली.

या ठिकाणी सर्व उपस्थित विद्यार्थ्यांचे तेथील अग्निशामक दलाने स्वागत केले तसेच सर्व विद्यार्थ्यांना बालदिनाच्या शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांना अग्निशामक दलाचे महत्त्व व कार्य समजावून सांगितले. विद्यार्थ्यांना अग्निशामक दलाची कामे जसे इमारतीची आग विझवणे, महापुरातून लोकांचा बचाव करणे तसेच अनेक नैसर्गिक आपत्तीतून लोकांचा बचाव करण्यासाठी अग्निशामक दल अखंडपणे कार्य करत असते. याबद्दल विद्यार्थ्यांना तेथील अधिकारी व कर्मचारी यांनी आग विझवण्याची विविध साधने व साहित्यांची माहिती सांगून अनेक प्रात्यक्षिके करून दाखवली.

या क्षेत्रभेटीतून विद्यार्थ्यांना अग्निशामक दलाचे कार्य, महत्त्व यांची माहिती मिळाली. सर्व मुले खूप आनंदाने सहभागी झाली. अग्निशामक दलाच्या कर्मचाऱ्यांचे व अधिकार्यांचे सर्वांनी मनापासून आभार मानले. यावेळी विद्यालयाचे शिक्षक युवराज धनवटे, सहल प्रमुख मोटे मॅडम, प्रवीण पाटील तसेच शाळेचे शिपाई उपस्थित होते.



## संपादकीय

# महायुतीचे पारडे जड

गेला जवळपास महिनाभर विधानसभा निवडणुकांच्या प्रचाराची जोरदार रणधुमाळी राज्यात सुरू होती, ती सोमवारी नियमानुसार संपली. निवडणुकीच्या प्रचारात आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडतातच. त्यात महायुती सरकारच्या उत्तम कामगिरीमुळे त्यांच्या विरोधात महाविकास आघाडीच्या नेत्यांकडे कुठलेही ठोस मुद्देही नव्हते. निवडणुकीचे पारडे सत्ताधारी महायुतीकडे झुकलेले स्पष्ट दिसते आहे हे स्वाभाविकच म्हटले पाहिजे.

राज्यातील २८८ विधानसभा मतदारसंघांसाठी होणाऱ्या या निवडणुकीतील मतदान बुधवारी, २० तारखेला होईल. लोकसभा निवडणुकीत अपघाताने काँग्रेस पक्षाच्या हाताला अल्पसे यश लागले खरे, परंतु वेगळी रणनीती आखून महायुतीने विधानसभेला बाजी पालटली. अत्यंत आत्मविश्वासाने महायुतीतील तिन्ही पक्षांनी म्हणजे भारतीय जनता पक्ष, एकनाथ शिंदे यांची शिवसेना व अजित पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षाने राज्यभर दणक्यात प्रचार केला. आता बुधवारी मतदान होणार असून २३ नोव्हेंबर रोजी निवडणुकीचा निकाल समोर येईल. सोमवारी प्रचाराच्या शेवटच्या दिवशी राज्यात सभांचा जोरदार धुमधडाका पहायला मिळाला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वरवंड (ता. दौंड) येथे भाजपचे उमेदवार आमदार राहुल कुल यांच्या प्रचारार्थ आयोजित सांगता सभेमध्ये राज्यात महायुतीचेच सरकार येणार अशी ग्वाही दिली, तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महायुतीच्या मुंबादेवीतील उमेदवार शायन एनसी यांच्यासाठी शेवटची सभा घेतली. शायना एनसी या मूळच्या भाजपच्या असून मुंबादेवी हा मतदारसंघ शिवसेनेला सुटल्यानंतर त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. भारतीय जनता पक्षाने प्रचारात आपली संपूर्ण ताकद झोकून दिली होती. तिकीटवाटपादरम्यान अखेरच्या दिवसापर्यंत मतभेद चव्हाट्यावर आलेल्या विरोधकांच्या महाविकास आघाडीनेही प्रचारात प्रयत्नपूर्वक जोर लावला. त्यामुळे प्रचार अटीतटीचा झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी जातीने उपस्थित राहात प्रचारसभा गाजवत महायुतीला बळ दिले. काँग्रेस पक्षानेही आपली केंद्रीय नेतेमंडळी राहुल गांधी व प्रियांका गांधी यांनी प्रचारात उतरवले. महायुती सरकारने 'लाडकी बहीण योजने'ची घोषणा केल्यापासून भांबावलेले विरोधक उसने अवसान आणून प्रचार करताना भासले. महायुतीच्या लाडकी बहीण योजनेचा बोलबाला सगळीकडे असल्याने मविआनेही तशाच योजनेचे आश्वासन देण्याचा दुबळा प्रयत्नही केला. महायुतीच्या 'बटेंगे तो कटेंगे' आणि 'एक है तो सेफ है' या घोषणांविरोधात फेक नरेटिव्ह तयार करून गैरसमज पसरवण्याचा प्रयत्नही मविआच्या नेत्यांनी केला. परंतु देवेंद्र फडणवीस व अन्य नेत्यांनी त्याला जोरदार प्रत्युत्तर दिले. महाविकास आघाडी मतांचे 'वोट जिहाद' करते आहे. आपल्याला रामराज्य आणायचे असल्यास 'धर्मयुद्ध' करावेच लागेल असे प्रतिपादन फडणवीस यांनी केले. यावर निवडणूक आयोगाने 'धर्मयुद्ध' शब्दाला आक्षेप घ्यावा अशी मागणी उद्धव ठाकरे यांनी केली. परंतु त्यालाही फडणवीस यांनी सडेतोड उत्तर दिले. उद्धव ठाकरेजी तुम्हाला 'जिहाद' शब्द आवडतो, तर माझ्या 'धर्मयुद्ध' शब्दावर आक्षेप घ्या, असे खुले आव्हानच त्यांनी ठाकरे यांना दिले. निराशेच्या गर्तेतील विरोधकांनी पातळी सोडून प्रचार करणेही अपेक्षितच होते. 'एक है तो सेफ है'वरून राहुल गांधींनी सेफ म्हणजे तिजोरी पत्रकारांसमोर आणत नेहमीचा उद्योगपती अदानी आणि मोदी यांचे संगनमत असल्याचा आरोप केला, परंतु भाजप नेते विनोद तावडे यांनी त्यांना प्रत्युत्तर देताना अदानी आणि वाड्रा यांचे फोटो दाखवले. अदानी आणि काँग्रेसचे नाते कसे जुने आहे हे त्यांनी स्पष्ट करून दाखवले हे बरेच झाले.

# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचा वर्धापन दिन

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ ही मराठी भाषा व संस्कृतिसंवर्धक एक शासकीय संस्था. मराठी भाषा व साहित्य यांचा सर्वांगीण विकास करून साहित्याबरोबरच इतिहास व कला या क्षेत्रांतील महाराष्ट्राचा थोर वारसा जतन करणे हा या मंडळाचा उद्देश आहे. याची स्थापना महाराष्ट्र राज्य शासनाने १९ नोव्हेंबर १९६० रोजी केली. महाराष्ट्र राज्य-स्थापनेच्या वेळी (१ मे १९६०) जी धोरणविषयक सूत्रे जाहीर केली गेली होती त्यानुसार तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या अध्यक्षतेखाली हे मंडळ स्थापन करण्यात आले.

प्रारंभी पाच वर्षांची मुदत असलेले हे मंडळ १९८०पर्यंत पाच वेळा पुनर्रचित करण्यात आले. तोपर्यंत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे मंडळाचे अध्यक्ष होते. डिसेंबर १९८०मध्ये या मंडळाचे विभाजन करण्यात आले व त्यातून महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ वेगळे करण्यात आले. तेव्हापासून सुरेंद्र बारलिंगे हे महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष आहेत. मंडळाच्या अध्यक्षांची व इतर सदस्यांची नियुक्ती राज्य शासनातर्फे दर तीन वर्षांनी करण्यात येते.

या मंडळाने काही महत्त्वाचे प्रकल्प आणि उपक्रम सुरू केले व त्यासाठी वेळोवेळी तज्ञांच्या वेगवेगळ्या समित्याही नेमण्यात आल्या. त्यांपैकी मराठी विश्वकोशाचा प्रकल्प १९८०पर्यंत या मंडळामार्फतच कार्यान्वित करण्यात आला. महाराष्ट्राच्या राजकीय, सांस्कृतिक व सामाजिक इतिहासाचे पंचखंडात्मक प्रकाशन करणे, मराठी बोलभाषांचा अभ्यास व प्रकाशन करणे, आधुनिक ज्ञानविज्ञानांचा शास्त्रीय ग्रंथमालेच्या रूपाने मराठीतून परिचय करून देणे, ललित कलांविषयीचे संशोधन व प्रकाशने पुरस्कृत करणे व मराठी महाशब्दकोशाची रचना करणे यांसारखे महत्त्वाचे उपक्रम तज्ञांच्या मदतीने हाती घेण्यात आले. आंतरभारती व विश्वभारती योजनेखाली द्वैभाषिक शब्दकोश, भाषाप्रवेश व साहित्यपरिचय यांसारखी पुस्तके प्रकाशित करणे हा मंडळाचा एक वैशिष्ट्यपूर्ण प्रकल्प म्हणता येईल.



भारतीय व परदेशी भाषांतील अभिजात व मौलिक ग्रंथाचे भाषांतर करण्यासाठी मंडळाने खास भाषांतर विभाग निर्माण केला. याखेरीज मराठी वाङ्मयकोशाचे संपादन तसेच एकोणिसाव्या शतकात व विसाव्या शतकाच्या पहिल्या दोन दशकांत प्रसिद्ध झालेल्या, पण सध्या अनुपलब्ध असलेल्या अशा महत्त्वाच्या मराठी साहित्याचे पुनर्प्रकाशन यांसारखे उपक्रमही मंडळाने सुरू केले. महत्त्वाच्या अभ्यासपूर्ण अशा मराठी ग्रंथांच्या प्रकाशनास तसेच नवोदित लेखकांच्या लेखन-प्रकाशनासाठी मंडळातर्फे अनुदानही दिले जाते. नवोदित लेखकांसाठी शिबिरे भरवून त्यांना मार्गदर्शन करण्याचा उपक्रमही मंडळाने सुरू केला आहे. मंडळातर्फे अनेक महत्त्वाच्या नियतकालिकांना तसेच महत्त्वाच्या संदर्भग्रंथांना अनुदान दिले जाते. महादेवशास्त्री जोशी यांचा भारतीय संस्कृतिकोश, दे.द. वाडेकर यांचा मराठी तत्वज्ञान महाकोश, सरोजिनी बाबर यांची 'समाजशिक्षण माला', विद्वद्रत्न डॉ. दप्तरी-लेखसंग्रह (तीन खंड) यांसारख्या मौलिक प्रकाशनांना मंडळाने अनुदान दिले आहे.

मंडळातर्फे आणि मंडळाच्या अनुदानामुळे प्रकाशित झालेले वाङ्मयधन संख्येने आणि गुणवत्तेने मोठे आहे. शास्त्रीय ग्रंथमालेत वेगवेगळ्या वैज्ञानिक व तंत्रविद्येवरील शंभरांहून अधिक ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत, तर ऐंशीहून अधिक ग्रंथ भाषांतरयोजनेखाली प्रकाशित झाले आहेत. आंतरभारती योजनेखाली सु. तीस पुस्तके प्रसिद्ध झाली असून ती अत्यंत उपयुक्त आहेत. मंडळाच्या अनुदानामुळे सु. सहाशेपेक्षा अधिक प्रसिद्ध झालेले, विविध विषयांवरील अभ्यासपूर्ण ग्रंथ मराठी वाङ्मयात मोलाची भर टाकणारे आहेत. मराठीतील नामवंत साहित्यिक-संशोधकांना गौरववृत्ती देऊन त्यांचा सन्मान करण्याची प्रथाही मंडळाने सुरू केली आहे.

महाराष्ट्र राज्याच्या सांस्कृतिक क्षेत्रात या मंडळाने हाती घेतलेले प्रकल्प व त्या कामी मराठी तज्ञांचे मिळवलेले सहकार्य यांना विशेष महत्त्व आहे.

**-रा.ग. जाधव (मराठी विश्वकोष)**

# लढवय्यी वीरांगना : झाशीची राणी लक्ष्मीबाई

भारतीय वसुंधरेला अभिमान वाटणारी झाशीची राणी वीरांगना लक्ष्मीबाई खऱ्या अर्थाने एक आदर्श नायिका होती. त्यांचा जन्म १९ नोव्हेंबर १८३५ रोजी काशी येथे झाला. त्यांचे वडील मोरोपंत तांबे हे चिकनाजी आप्पांचे आश्रित होते. त्यांच्या आईचे नाव भागीरथीबाई होते. महाराणींचे आजोबा बळवंत राव हे बाजीराव पेशव्यांच्या सैन्यात सेनापती असल्यामुळे मोरोपंतांनाही पेशव्यांनी आशीर्वाद दिला होता. लक्ष्मीबाईंना बालपणी मनुबाई या नावाने ओळखले जायचे.

विवाह : येथे १८३८मध्ये गंगाधर राव यांना झाशीचा राजा घोषित करण्यात आले. ते विधुर होते. १८५०मध्ये त्यांचा विवाह मनुबाईंशी झाला. १८५१मध्ये त्यांना रत्न नावाचा मुलगा झाला. झाशीच्या कानाकोपऱ्यात आनंदाची लाट पसरली, पण चार महिन्यांनी तो मुलगा गेला.

संपूर्ण झाशी दुःखाच्या सागरात बुडाली. राजा गंगाधर राव यांना इतका मोठा धक्का बसला की, ते सावरले नाहीत आणि २१ नोव्हेंबर १८५३ रोजी त्यांचे निधन झाले. महाराजांचा मृत्यू राणींना असह्य झाला असला तरी त्या घाबरल्या नाही त्यांनी विवेक गमावला नाही. राजे गंगाधर राव यांनी त्यांच्या हयातीतच त्यांच्या कुटुंबातील मुलगा दामोदर राव यांना दत्तक पुत्र मानून इंग्रज सरकारला माहिती दिली होती, पण ईस्ट इंडिया कंपनीच्या सरकारने दत्तक पुत्र नाकारला.



संघर्ष : २७ फेब्रुवारी १८५४ रोजी लॉर्ड डलहौसीने दामोदररावांच्या दत्तक पुत्राला दत्तक घेण्याच्या धोरणाखाली नकार दिला आणि झाशीचे ब्रिटीश राज्यात एकीकरण करण्याची घोषणा केली. पोलिटिकल एजंटची माहिती मिळताच राणींच्या तोंडून 'मी माझी झाशी देणार नाही' हे वाक्य बाहेर पडले. ७ मार्च १८५४ रोजी झाशी इंग्रजांच्या ताब्यात गेली. राणीने पेन्शन नाकारली व नगरच्या राजवाड्यात राहू लागली.

येथूनच भारताच्या पहिल्या स्वातंत्र्य क्रांतीचे बीज अंकुरले. उत्तर भारतातील नवाब व राजे व सम्राट इंग्रजांच्या राज्य लिपसाच्या धोरणावर असंतुष्ट झाले आणि सर्वांमध्ये बंडाची आग पेटली. राणी लक्ष्मीबाईंनी ही सुवर्णसंधी मानून क्रांतीची ज्योत अधिक प्रज्वलित करून इंग्रजांविरुद्ध उठाव करण्याची योजना आखली.

नवाब वाजिद अली शाह यांची बेगम हजरत महल, शेवटच्या मुघल बादशहाची बेगम झीनत महल, खुद्द मुघल सम्राट बहादूर शाह, नाना साहेबांचे वकील अजीमुल्ला, शहागढचे राजा, वानपूरचे राजा मर्दन सिंग आणि तात्या टोपे इत्यादी सर्वांनी या कामात सहकार्य केले.

बंड : संपूर्ण देशात क्रांतीची संघटित आणि ठामपणे अंमलबजावणी करण्याची तारीख ३१ मे १८५७ निश्चित करण्यात आली होती, पण त्याआधीच क्रांतीची ज्योत पेटली आणि ७ मे १८५७ रोजी मेरठमध्ये आणि ४ जून १८५७ रोजी कानपूरमध्ये भीषण दंगल उसळली. २८ जून १८५७ रोजी कानपूर पूर्णपणे स्वतंत्र झाले. ब्रिटीश सेनापती सर ह्यू रोजने आपले सैन्य संघटित करून बंड दडपण्याचा प्रयत्न केला. २३ मार्च १८५८ रोजी झाशीची ऐतिहासिक लढाई सुरू झाली.

उपसंहार : कमांडर सर ह्यू रोजने आपल्या सैन्यासह राणींचा सर्व शक्तीनिशी पाठलाग केला आणि शेवटी तो दिवस आला जेव्हा त्याने भयंकर युद्धानंतर ग्वाल्हेरचा किल्ला जिंकला. या युद्धातही राणी लक्ष्मीबाई आपले कौशल्य दाखवत राहिल्या. राणी लक्ष्मीबाईंनी स्वातंत्र्ययुद्धात आयुष्याचे शेवटचे बलिदान देऊन जनतेला चैतन्य दिले आणि स्वातंत्र्यासाठी बलिदानाचा संदेश दिला. ग्वाल्हेरची शेवटची लढाई १८ जून १८५८ रोजी झाली आणि राणीने आपल्या सैन्याचे कुशलतेने नेतृत्व केले. जखमी होऊन अखेरीस हौतात्म्य पत्करले. **(साभार : इंटरनेट)**



## बदलते तंत्रज्ञान

### फास्ट चार्जिंगमुळे होऊ शकते तुमच्या फोनचे नुकसान?

आधी स्मार्टफोन म्हटलं की, कॅमेरा, साऊंड क्वॉलिटी बघितली जात होती, पण आता इतरही अनेक फीचर्स मोबाइल विकत घेताना पाहिले जातात. त्यातील एक म्हणजे स्मार्टफोनची बॅटरी. अल्ट्रा-फास्ट चार्जर नेहमीपेक्षा अधिक वेगाने स्मार्टफोन चार्ज करण्याच्या क्षमतेमुळे लोकप्रिय होत आहेत, पण हे चार्जर नियमितपणे वापरताना अधिक सावध असले पाहिजे.



* हिट बिल्डअप : अल्ट्रा-फास्ट चार्जिंगमधील प्राथमिक समस्यांपैकी एक म्हणजे तुमच्या स्मार्टफोनमध्ये जास्त उष्णता निर्माण होऊ लागते. जलद चार्जिंगमुळे बॅटरीमध्ये अगदी कमी वेळात भरपूर पॉवर जाते, ज्यामुळे डिव्हाइस जास्त गरम होते आणि जे काही वेळेस धोकादायकसुद्धा ठरू शकते.

उष्णतेमुळे तुमच्या स्मार्टफोनवर थर्मल ताण येऊ शकतो, यामुळे अंतर्गत घटकांचे नुकसान होऊ शकते, बॅटरीचे आयुष्य कमी होऊ शकते, मोबाइल वापरादरम्यान तो जास्त गरम होऊ शकतो आणि काही वेळा स्फोटसुद्धा होऊ शकतो.

* बॅटरी डिग्रेडेशन : तुमचा फोन अल्ट्रा-फास्ट चार्ज करणे हे त्यांच्यासाठी उपयुक्त आहे, जे मुख्यतः दिवसभर कामासाठी बाहेर असतात. मोबाइल जलद चार्ज करणे वेळ वाचवत असेल, तरीही यामुळे बॅटरीचे आयुष्यदेखील कमी होते. तुमच्या स्मार्टफोनमध्ये लिथियम-आयन बॅटरी असल्यास, फास्ट चार्जिंगमुळे स्मार्टफोन लवकर खराब होईल.

* कॉम्पॅटिबिलिटी समस्या : सर्व स्मार्टफोन्स अल्ट्रा-फास्ट चार्जिंग हाताळण्यासाठी डिझाइन करण्यात आलेले नाहीत, त्यामुळे जर जास्त पावरफुल चार्जर तुमच्या फोनसाठी वापरत असाल तर तो स्मार्टफोनला हाताळण्यासाठी कठीण जाऊ शकते. परिणामी कॉम्पॅटिबिलिटी समस्या, फोन जास्त गरम होणे किंवा अगदी चार्ज होत नाही अशा समस्या उद्भवू शकतात.

* वीजबिल वाढीचा धोका : अल्ट्रा-फास्ट चार्जर्समुळे वीजबिलात वाढ होण्याचा धोका असतो, ज्यामुळे स्मार्टफोनमधील संवेदनशील (सेन्सिटिव्ह) घटकांना नुकसान होऊ शकते म्हणजेच चार्जिंग पोर्ट किंवा बॅटरी. अनेक चार्जरमध्ये सुरक्षिततेची सुविधा असते, तरीही विजेच्या समस्या निर्माण होऊ शकतात, जेव्हा चार्जिंगचे वातावरण अस्थिर असते.

* रिड्यूस बॅटरी लाईफस्पॅन : आता लाँच करण्यात आलेले नवीन स्मार्टफोन जुन्या मॉडेल्सपेक्षा जलद चार्जिंगला अधिक चांगल्या प्रकारे हाताळण्यासाठी डिझाइन केलेले आहेत.

# लघुकथेचे प्रवर्तक व विनोदी लेखक कॅ. लिमये



निमित्त

मराठी कथाकार आणि विनोदकार अशी कॅ. गोपाळ गंगाधर लिमये यांची ओळख राहिलेली आहे. त्यांचा आज स्मृतिदिन. लिमये यांचा जन्म २५ सप्टेंबर १८८१ रोजी पुणे येथे झाला. तथापि त्यांच्या वडिलांची बदली बेळगावला झाल्यामुळे त्यांचे बालपण तेथे गेले. त्यांचे प्राथमिक शिक्षण बेळगावलाच झाले. माध्यमिक शिक्षण त्यांनी पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमधून घेतले. पुढे मुंबईच्या ग्रँट मेडिकल कॉलेजातून वैद्यकीय पदवी घेतली. वैद्यकीय परीक्षेत त्यांना सुवर्णपदक मिळाले. 'इंडियन मेडिकल सर्व्हिस'साठी त्यांची निवड होऊन १९१८ते १९२१ ह्या कालखंडात त्यांना सैन्यात कॅप्टन या हुद्यावर नेमले गेले. १९२२ ते १९५४ पर्यंत मुंबई महानगरपालिकेत आरोग्याधिकारी म्हणूनच त्यांनी काम पाहिले.

लिमये यांनी १९१२पासून लेखनाला सुरुवात केली. 'प्रेमाचा खेळ' ही त्यांची पहिली कथा १९१२मध्ये मासिक मनोरंजनात प्रसिद्ध झाली. त्याच सुमारास बापूची प्रतिज्ञा ही त्यांची विनोदी दीर्घकथा पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाली. सखा सोनचाफा व इतर गोष्टी (१९२२), वनज्योत्स्ना (दीर्घकथा, १९२४), शकूचा भाऊ (१९२८), तिच्याकरिता (१९३३) आणि हेलकावे (१९३८) हे त्यांचे अन्य कथाग्रंथ. यांखेरीज त्यांच्या काही कथांचा एक संग्रह-गो.ग. लिमये यांच्या निवडक कथा -१९७० साली राम कोलारकर यांनी संपादून प्रसिद्ध केला. १९२०च्या पूर्वीची त्यांची कथा घटनाप्रधान, बोधप्रधान आणि काहीशी पाल्हाळिक होती, परंतु १९२२ साली त्यांनी लिहिलेली 'किस्मत' ही कथा मराठी कथेला वेगळी वाट दाखवणारी ठरली. या कथेत त्यांनी माणसाच्या मनाचा वेध घेतला. घटनाप्रधान आणि कल्पनारम्य वातावरणातून मराठी कथेला वास्तवतेकडे वळविण्याचा, अंतर्मुख करण्याचा प्रयत्न केला. ह्याशिवाय युद्धाच्या अनुभवांवर कथा लिहून मराठीत युद्धकथांची लक्षणीय भर घातली.

कथेइतकेच मोलाचे कार्य लिमये यांनी विनोदाच्या क्षेत्रात केले. विनोदी लेखसंग्रह (१९२३), विनोदसागर(१९२५), जुना बाजार (१९३२), गोपाळकाला (१९४२), तुमच्याकरिता (१९५०) व विनोदबकावली (१९६५) हे त्यांच्या विनोदी लेखांचे संग्रह. त्यांच्या आरंभीच्या विनोदावर कोल्हटकर व गडकरी यांची छाप दिसते. नंतर मात्र त्या प्रभावाच्या ते बाहेर पडलेले दिसतात. मानवी स्वभावाच्या सूक्ष्म अवलोकनातून त्यांचा विनोद निर्माण झालेला आहे. मानवी जीवनातील विसंगतींचे दर्शन तो घडवतो पण कुठेही बोचक उपरोध नसल्यामुळे तो प्रसन्न वाटतो.

साध्या साध्या घटनांतून विनोदनिर्मिती करण्याचे त्यांचे कौशल्य 'छकडा, सिंहगड आणि कुत्रे', 'आमची (आळंदीची) सायकल ट्रिप,' 'पाण्याच्या बादलीचा विलक्षण खटला' यांसारख्या विनोदी लेखांतून सहज दिसून येते. कथा, नाट्य, प्रवासवर्णन, आत्मनिवेदन अशा अनेक माध्यमांचा विनोदासाठी त्यांनी मोठ्या कुशलतेने उपयोग करून घेतला. त्यामुळे त्यांच्या विनोदी लेखनात लक्षणीय विविधता आलेली आहे.

सैन्यांतील आठवणी (१९३९) हे लिमये यांचे आत्मनिवेदनात्मक पुस्तक. पेशावर, दारेसलाम, बगदाद इ. ठिकाणच्या त्यांच्या आठवणी त्यांनी त्यात मनोरंजक पद्धतीने सांगितल्या आहेत. याशिवाय विख्यात फ्रेंच नाटककार मोल्येर यांच्या काही नाटकांचे मराठी अनुवाद त्यांनी केले. वैद्यक, शुश्रूषा अशा विषयांशी संबंधित पुस्तकेही त्यांनी लिहिली आहेत. पुणे येथे १८ नोव्हेंबर १९७१ रोजी ते निधन पावले.

**-म.ना. अदवंत (मराठी विश्वकोष)**

## क्लिक...क्लिक...!



**मुरुड : कार्तिक महिन्यातील आळंदी यात्रेसाठी वारकऱ्यांची पायी दिंडी मार्गस्थ झाली.** (छाया : सुधीर नाझरे)

## आरोग्य प्रहर

### रक्तदाब तपासण्याची योग्य पद्धत कोणती?

अनेकदा आजारी पडल्यावर डॉक्टर रक्तदाब (बीपी) चेक करतात. रक्तदाब चेक करण्यासाठी आपल्या हाताला बीपी कफ हा बँड लावला जातो, पण तुम्हाला माहिती आहे का हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी आरोग्याचे निदान आणि व्यवस्थापन करण्यासाठी अचूक रक्तदाब मोजमाप आवश्यक आहे, कारण ब्लड प्रेशर तपासताना हाताची चुकीची किंवा अयोग्य स्थिती छोट्या घटकांवर परिणाम करू शकते.



डॉ. सुधीर कुमार यांनी एक्स (ट्विटर)वर एक पोस्ट शेअर केली होती. या पोस्टमध्ये हाताच्या नॉन-स्टँडर्ड आर्म पोझिशनमुळे (म्हणजे शरीराचा खांद्यापासून पंजापर्यंतचा भाग) ब्लड प्रेशर रीडिंगचे प्रमाण वाढवू शकते, ज्यामुळे अनावश्यक चिंता किंवा चुकीचे उपचार सांगितले जाऊ शकतात, कारण अलीकडील अभ्यासात असे आढळून आले आहे की, नॉन-स्टँडर्ड आर्म पोझिशन्समुळे बीपी रीडिंग लक्षणीयरीत्या कमी होऊ शकते. विशेषत: जेव्हा हाताला मांडीवर आधार दिला जातो तेव्हा सिस्टोलिक बीपी ३.९ मिमी एचजी आणि डायस्टोलिक बीपी ४.० मिमी एचजीने जास्त होता. मांडीवर हात ठेवल्यामुळे सिस्टोलिक बीपी ६.५ मिमी एचजी आणि डायस्टॉलिक बीपी ४.४ मिमी एचजीने जास्त झाला.

क्लिनिक असो किंवा घर दोन्हीकडे बीपी तपासताना अयोग्य किंवा चुकीच्या पद्धतीने हात ठेवणे ही एक सामान्य समस्या आहे, पण यामुळे रक्तदाबावर परिणाम का होतो हे समजून घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे, कारण उच्च रक्तदाब हा जागतिक स्तरावर आरोग्याच्या वाढत्या चिंतेचा विषय बनला आहे.

याबद्दल जाणून घेण्यासाठी आशियन रुग्णालयाच्या वरिष्ठ सल्लागार, इंटरव्हेंशनल कार्डिओलॉजी, डॉ. प्रतीक चौधरी यांच्याशी चर्चा केली. ते म्हणतात की, तुमच्या हाताची स्थिती, जिथे रक्तदाब तपासण्यासाठी बीपी कफ बांधला जातो आणि तो फुगवून रक्तदाबाचे अचूक रीडिंग करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतो. जर तुमचा हात तुमच्या हृदयाच्या पातळीच्या वर असेल, जो सामान्यतः स्टर्नमच्या मध्यभागी असतो, तर तुमचा रक्तदाब नेहमीपेक्षा कमी असू शकतो. दुसरीकडे जर तुमचा हात हृदयाच्या पातळीपेक्षा खाली असेल, तर तुमचा रक्तदाब जास्त असू शकतो. या गोष्टी गुरुत्वाकर्षणाच्या प्रभावामुळे उद्भवतात.

# आमदार रविशेठ पाटील प्रचंड मताधिक्याने जिंकणार -खा. तटकरे

## खांब येथे महायुतीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांची बैठक

**धाटाव : प्रतिनिधी**

पेण-सुधागड-रोहा मतदारसंघाचे उमेदवार आमदार रविशेठ पाटील यांच्या प्रचारार्थ रोहा तालुक्यातील खांब येथे सोमवारी (दि.१८) पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या उपस्थितीत बैठक आयोजित करण्यात आली होती. या वेळी खासदार सुनील तटकरे यांनी आपल्या भाषणात आमदार रविशेठ पाटील हे प्रचंड मताधिक्य मिळवून निवडून येतील, असा विश्वास व्यक्त केला.



या बैठकीत खासदार धैर्यशील पाटील, उमेदवार रवींद्र पाटील, भाजपचे संघटक प्रमुख सतीश धारप, रोहा तालुका भाजप अध्यक्ष अमित घाग, शिवसेना तालुकाप्रमुख अ‍ॅड. मनोज कुमार शिंदे यासह महायुतीचे सर्व पक्षाचे नेते पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी खासदार सुनील तटकरे यांनी उपस्थितीत मागदर्शन करताना सांगितले की, या बैठकीमुळे कार्यकर्ते व पदाधिकारी तिच्यात नवचैतन्य वातावरण निर्माण झालेले आहेच, परंतु या मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसने गेल्या अनेक वर्षापासून ऋणानुबंध ठरले आहेत. संपूर्ण विभागात व गावागावात कोट्यावधी रुपयाचे विकास कामे झालेले आहेत. माझ्या खासदारकीच्या निवडणुकीत महायुतीच्या सर्व नेत्याने एकत्र देऊन ह्या मतदारसंघाने मला पन्नास हजार मतांचा लीड दिले होते. त्यामुळे येथील जनतेचे नेहमीच माझ्यावर ऋण आहेत. मग लाडकी बहीण, शेतकऱ्यांसाठी व समाजातील सर्व घटकांसाठी योजना अतिशय उत्तम पद्धतीने राबवलेल्या आहेत. केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली एनडीए सरकार आहेच, परंतु या महाराष्ट्रातसुद्धा महायुतीचे सरकार येणारच आहे. मुंबई, कोकण नेहमीच महायुतीचा बालेकिल्ला राहिलेला आहे त्यामुळे रायगडमध्ये सर्व जागा निश्चितच निवडून येतीलच त्या रविशेठ पाटील यांचासुद्धा विजय असेल, परंतु या विजयात मतदानाच्या टक्केवारीत कणभर तरी वाटा निश्चित माझ्या रोह्याचा जास्त असेल त्यामुळे येत्या २३ तारखेला पेण विधानसभेवर गुलाल आपलाच आहे, असा विश्वास त्यावेळी खासदार तटकरे यांनी बैठकीत व्यक्त केला.

तटकरे यांनी विरोधकांचा खरपूस समाचार घेताना सांगितले की, लोकसभेच्या माध्यमातून विरोधकांनी संविधान बदलणार असा फेक निगेटिव्ह पसरवला, परंतू लाडकी बहीण योजना अत्यंत चांगली असल्यामुळे महाविकास आघाडी तिथेही योजनेच्या विरोधात कोर्टात धाव घेतली. तिथे कोर्टाची चपराक मिळाल्यानंतर जाहीरनामाचा माध्यमातून आता याच लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून तीन हजार रुपये देऊ असे सांगण्यात आले, परंतु येथील जनता सुज्ञ आहे येत्या विधानसभेच्या निवडणुकीत संपूर्ण बहुमताने या महाराष्ट्रात सरकार येईल, असा विश्वास तटकरे यांनी व्यक्त केला.

या रोहा तालुक्यातील वरसे, खांब, मेढा व नागोठणे विभागात राष्ट्रवादी, भाजप, शिंदे शिवसेना व आरपीआय नेत्यांची ताकद आहे. जनता नेहमीच सुखदुःखात, रात्री आपण रात्री व विकास कामे करणाऱ्यांच्या नेहमीच पाठीशी राहते. या निवडणुकीत विरोधकांच्यात एक वाक्यता नाही. विरोधकांचे ना इथे घर न दार, न कोणतीच निवडणूक लढवण्याचा अनुभव नाही त्यामुळे येथील विकास फक्त आणि फक्त येथील प्रमुख पक्षाने केलेला आहे. तिथेच त्यांच्या पराजयाचे अर्ध तिकिट कापला गेलेला असल्यामुळे महायुतीचे उमेदवार रविशेठ पाटील यांचा ६०००० मताधिक्याने विजय होईल, असे खासदार धैर्यशील पाटील यांनी सांगितले.

> **विभागात या निवडणुकीत महायुतीच्या सर्व कार्यकर्त्यांनी घराघरात जाऊन एकजुटीने प्रचार केलेला आहे. प्रत्येक गावागावा गाव कमळ या चिन्हांचा प्रचार झालेला आहे. विकास हा येथील जनतेचा राष्ट्रवादी, भाजप, शिंदे शिवसेना व आरपीय ने केलेला आहे हे कोणी नाकारू शकत नाही त्यामुळे आजच्या बैठकीत उपस्थित बघता माझा विजय तुमच्या विश्वासामुळे निश्चित आहे.**
> **-आमदार रविशेठ पाटील, उमेदवार**

# महायुती सरकारने विकासकामे केली -आमदार भरत गोगावले

**महाड : प्रतिनिधी**

महाड विधानसभा मतदारसंघातील महायुतीकडून शिवसेनेचे उमेदवार आमदार भरत गोगावले हे हिंदू धर्मरक्षक आहेत, सर्वांना मदत करणारे आहेत, असा गौरोपर उल्लेख हभप कोकरे महाराज यांनी नाते रायगड विभाग प्रचार सभेदरम्यान केले, तर आपण तालुक्यातील दुर्गम भागात गावागावात पोहचलो असून महायुतीच्या सरकारने अनेक विकासकामे केली असल्याचे उमेदवार आमदार गोगावले यांनी सांगितले.



व्यासपीठावर भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष बिपीन म्हामुणकर, शिवसेनेचे कोअर कमिटी सदस्य विकास गोगावले, उपजिल्हाप्रमुख सुरेश महाडिक, विजय सावंत, तालुका प्रमुख बंधु तरडे, राष्ट्रवादीचे तालुका अध्यक्ष निलेश महाडीक, आरपीआयचे तालुका अध्यक्ष मोहन खांबे, सेक्रेटरी जाधव, भाजपचे सरचिटणीस महेश शिंदे, डॉ. खेडेकर, माजी सभापती सिद्धी खांबे, राजू देशमुख, बंडू देशमुख आदी उपस्थित होते.

महाड विधानसभा निवडणुकीदरम्यान वारकरी संप्रदायाचे हभप कोकरे महाराजांनी १० हजार वारकरी महायुतीसाठी मैदानात उतरल्याची माहित देत महाराष्ट्रात पाच प्रांत आहेत विदर्भात शास्त्रज्ञ, मराठवाड्यात संत, खानदेशात कवी, पश्चिम महाराष्ट्रात पुढारी, तर कोकणात लेखक व क्रांतीकारक जन्माला येतात. या पाचही प्रांतावर राज्य करणारे भरतशेठ नेते आहेत. ते केवळ महाडचे नेते नाही, तर राज्यातील कानाकोपऱ्यातून येणारे दीन दलित, गोरगरीब, निराधार, अनाथ यांचे मंत्रालयातील काम भरतशेठमुळे होते. जात, पात, धर्म, पंथ न पाहता सर्वांना ते आधार देतात.

सकाळपासून रात्री उशिरापर्यंत भरतशेठ यांच्या दारी मदतीसाठी जाणारा एकही जण रिकाम्या हाती येत नाही. अशा लोकप्रतिनिधीला भरघोस मतांनी विक्रमी मतांनी निवडून महाराष्ट्र हा महाविकास आघाडीकडून गिळंकृत करण्यापासून वाचवा, असे आवाहनही महाराजांनी केले.

या वेळी बोलताना आमदार गोगावले यांनी म्हटले की, नडगाव तर्फे बिरवाडी पंचायत समिती गणात १८ कोटींचा निधी आणला असून गेल्या ६० वर्षात झाले नाही ते गारपाटला, सानेकोंड अशा दुर्गम भागातील रस्ते, पाणी योजना आपल्या आमदारकीच्या काळात झाल्याचे सांगत पुन्हा महायुतीची सत्ता येणार असून महाडकरांसाठी हा सुवर्णकाळ असणार आहे. त्यामुळे तुमच्या आमदाराला भरघोस मतांनी विजयी करा, असे आवाहन केले.

बिपीन म्हामुणकर यांनी, महाड मतदारसंघातील ५२ हजार बहिर्णींना लाडकी बहिण योजनेचा लाभ मिळाला असल्याने ही मातृशक्तीच महायुतीला विजयी करेल, असा विश्वास व्यक्त केला.

राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष निलेश महाडिक यांनी लोकसभेला आमदार गोगावले यांनी खासदार सुनील तटकरे यांचे प्रामाणिक काम केले होते त्याची परतफेड राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी महाड तालुक्यातून त्यांना भरघोस मताधिक्य मिळवून देण्यासाठी काम करतील, अशी ग्वाही दिली आणि महायुतीचे सर्व घटक एकदिलाने काम करून आमदार गोगावलेंचा विजयी चौकार मारतील, असा विश्वास व्यक्त केला.

# निवडणुकीत १०० टक्के मतदान करावे

## ज्येष्ठ पत्रकार अरुण करमरकर यांचे आवाहन

**मुरूड : प्रतिनिधी**

राज्याचा खरा शिल्पकार जागरूक मतदारच आहे तेव्हा आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये आपण तर मतदान कराच, शिवाय आपल्या परिसरातील बांधवांना तसेच जागरूक मतदानाला प्रवृत्त करून शंभर टक्के मतदान करविण्यात सहभागी व्हा, असे आवाहन पत्रकार अरुण करमरकर यांनी केले.



मुरूड-जंजिरा हिंदू एज्युकेशन सोसायटी येथे प्रबोधन मंचतर्फे मतदार जनजागृती कार्यक्रमात मार्गदर्शन करताना ते बोलत होते. सभेचे अध्यक्षस्थान ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अनंत ठाकूर यांनी भूषविले. पत्रकार करमरकर मतदारांशी संवाद साधताना म्हणाले की, २० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या निवडणूकीना विशिष्ट प्रकारच्या वातावरणाची पार्श्वभूमी आहे.

जातीवाद, फुटीरता, कट्टरतावाद यांना पुन्हा एकदा ठळक बनविण्याचे प्रयत्न विविध भागात होत असल्याची अनेक उदाहरणे त्यांनी आपल्या भाषणात नमूद केली. सामाजिक सौहार्द, सामंजस्य तसेच सुरक्षा आणि सर्वांगीण विकास यांना बाधा उत्पन्न करण्याच्या दुष्ट हेतूने विघातक कारवाया केल्या जात आहेत याकडे त्यांनी लक्ष वेधले. त्या बद्दलची जाणीव जागवून आपले मतदानाचे कर्तव्य बजावण्याची आज नितांत गरज निर्माण झाली आहे. सनातन परंपरा जोपासणाऱ्या सण-उत्सवांना अपशकून करणाऱ्या देशविरोधी शक्ती, प्रवृत्तींना पायबंद बसविण्यासाठी आणि सदविचारी शक्ती संघटित करण्यासाठी संकल्पबद्ध होणे गरजेचे आहे असे प्रतिपादन करमरकर यांनी केले.

या वेळी प्रबोधन मंच, मुरूडचे समन्वयक एम.एस. जाधव यांनी प्रास्ताविक केले तर दीपाली जोशी यांनी सभेचे सूत्रसंचालन केले. मतदार जन जागरण कार्यक्रम यशस्वीतेसाठी मंचचे जिल्हा संघटक रवींद्र काळे, कुलाबा जिल्हा विहिंप सह मंत्री चेतन पटेल, संजय ठाकूर, समीर उपाध्ये, कुमार आर्कषी, अक्षय भाटकर आदींनी विशेष सहकार्य केले.

# माणगावमध्ये आदिती तटकरेंचा प्रचार

**माणगाव : प्रतिनिधी**

श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघातून महायुतीच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार आदिती तटकरे या सर्वाधिक मते मिळवून मोठ्या मताधिक्याने विजयी होणार असून माणगाव शहरातील प्रत्येक समाजाचा मोठ्या प्रमाणावर आदिती तटकरे यांना पाठिंबा मिळत आहे. आदिती तटकरे यांनी माणगाव शहरातील प्रत्येक प्रभागात सभा घेऊन मतदारांचे आशिर्वाद घेतले. त्यावेळी या सभांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. त्यामध्ये लाडक्या बहिणींचा भरभरून प्रतिसाद लाभला आहे.



आम्ही विकास कामांच्या जोरावर मते मागत आहोत. विरोधांकांनी या शहरात एकही विकास काम केलेले नाही. त्यामुळे आदीती तटकरे या रायगड जिल्ह्यात अव्वल क्रमांकांची मते मिळवून विजयी होतील असा विश्वास शिवसेना प्रवक्ते अ‍ॅड. राजीव साबळे यांनी व्यक्त केला.

ही विजयी मिरवणूक बाजारपेठेतील हॉटेल आनंद भूवन पासून सुरू झाली होती. ती पुर्व बाजूकडून खांदाड प्रवेशद्वाराजवळ पोहचली. तेथून रस्त्याच्या पश्चिमेकडून मोर्बा रोड ते बालाजी मंदिर येथे पोहचली. आदिती तटकरे यांनी मुंबई गोवा महामार्गावरील दुतर्फा असणाऱ्या व्यावसायिकांच्या भेटीगाठी घेत पदस्पर्श करून आशिर्वाद घेतले.

या मिरवणुकीत तरुणाई मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच सर्व जाती धर्माचे लोक, महायुतीचे पदाधिकारी, तरुण कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. विशेषतः मुस्लिम, बौद्ध, आदिवासी समाज बांधव आणि महिला या आदिती तटकरे यांना आशीर्वाद देण्यासाठी मोठ्या प्रमाणात मिरवणुकीत सहभागी झालेल्या होत्या. या वेळी हजारो कार्यकर्ते मिरवणुकीत सहभागी झाल्याने महायुतीचे मोठे शक्ती प्रदर्शन दिसले.

# सिंगिंग स्टारतर्फे कराओके गायन स्पर्धा



**अलिबाग : प्रतिनिधी**

सिंगिंग स्टार अलिबाग यांच्यातर्फे आयोजित करण्यात आलेल्या कराओके गायन स्पर्धेला गायक स्पर्धकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. रविवारी (दि. १७) या स्पर्धेच्या ऑडिशनसाठी स्पर्धक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

चेंढरे-अलिबाग येथील सिंगिंग स्टार स्टुडीओमध्ये रविवारी ऑडिशन घेण्यात आली. या ऑडिशनचे उद्घाटन अलिबाग प्रेस असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश सोनवडेकर यांच्या हस्ते करण्यात आले. परीक्षक कला पाटील, पत्रकार महेश पोरे, स्टुडिओचे मालक राजू बोराडे, आशा बोराडे, सतीश पानसरे यावेळी उपस्थित होते.

संगीत ही आयुष्याला प्रेरणा देणारी कला आहे. यातून मानसिक स्वास्थ्य मिळते. ही कला जोपासली पाहिजे. कराओकेमुळे अनेकांना आपल्यातील सुप्त गुण दाखविण्याची संधी मिळाली आहे. स्पर्धकांनी कोणतेही मानसिक दडपण न घेता गाण्याचा आनंद घ्यावा, असे पत्रकार प्रकाश सोनवडेकर यावेळी म्हणाले.

आपण कितीही चांगले गायक असलो तरी सराव महत्त्वाचा आहे. गायकांनी दररोज सराव केला पाहिजे, असे कला पाटील म्हणाल्या. समिधा कार्लेकर, प्रवीण लोखंडे, धनाजी कांबळे यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. या वेळी संदीप साठे, निलेश डबरे, अतुल नागावकर, राजेंद्र नरबेकर आदी उपस्थित होते. राजू बोराडे यांनी प्रास्ताविक केले. अशा बोराडे यांनी आभर प्रदर्शन केले.

# वडगाव शाळेला शैक्षणिक साहित्य वाटप; अगस्त्य फाउंडेशनचा उपक्रम

**चौक : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा उच्च प्राथमिक शाळेला एक्झॉमोबिल कंपनीकडून चांगली साथ मिळत आहे, त्यामुळे वडगाव शाळेच्या उत्कर्षात आणखी भर पडली आहे.

एक्झॉनमोबिल कंपनी च्या सामाजिक उत्तरदायित्व सहकार्यातून अगस्त्य फाऊंडेशन च्या माध्यमातून रायगड जिल्हा परिषद उच्च प्रथमिक शाळेतील सर्वच मुलांना दप्तर,पाणी बॉटल, वह्या, कंपास, पेन व स्वयं अध्ययन पुस्तिका व आवश्यक शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. शाळेत गरजू व दुर्बल घटकातील विद्यार्थी शिक्षण घेत असून या मुलांच्या शैक्षणिक उठावासाठी हे खूप महत्त्वाचे पाऊल ठरत आहे.


या वेळी एक्झॉनमोबिल कंपनीचे सीएसआर प्रमुख मयुरेश महाजन, जॉजू सर, शिवम चौबे, श्रीराम अय्यर, वृषाली सक्सेना व अगस्त्य इंटरनॅशनल फाऊंडेशनचे महाराष्ट्र प्रमुख पराग सावंत, सोनाली सिकंदर, सार्थक सपकाळ, शुभांगी लोंढे, हरिश्चंद्र सूर्यवंशी, अनिल चासकर, व्यवस्थापन समिती अध्यक्ष करून ठोंबरे, उपाध्यक्ष राजश्री जांभुळकर, विषय शिक्षिका सरस्वती कवाद, पदवीधर शिक्षक मयुरी धायगुडे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमासाठी अनेकांनी सहकार्य केले.

# रेवदंडा येथे हजरत पीर शहेनशहा वली उत्सव

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा येथे शुक्रवारी (दि. १५) दरगाह हजरत पीर शहेनशहा वली र.अ. उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.



रेवदंडा येथील तानसेबुवा वाडीतील दरगाह हजरत पीर शहेनशहा वली र.अ. हिंदू व मुस्लिम बांधवाचे श्रध्दा व भक्तीस्थान आहे. या ठिकाणी दरगाह हजरत पीर शहेनशहावली र.अ. उत्सव प्रतिवर्षी हिंदू मुस्लिम बांधव मोठया एकीने साजरा करीत असतात.

उत्सवाचे दिवशी हिंदू व मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने दरगाह हजरत पीर शहेनशहा वली र.अ. येथे भाविकांची मोठी गर्दी होते व भाविक भक्ती व श्रध्देने दर्शनाचा लाभ घेतात. गेली अनेक वर्ष दरगाह हजरत पीर शहेनशहा वली र.अ. उत्सव स्थानिक मुस्लिम व हिंदू बांधव मोठ्या एकोप्याने हा उत्सव साजरा करतात. काही वर्षांपुर्वी दरगाह हजरत पीर शहेनशहा वली र.अ. मंदिराचे जिर्णोध्दार करण्यात आले.

सर्वांचे मनाला भावेल, असे जिर्णोध्दार भाविकांनी या मंदिराचे केले आहे. सुबक व आकर्षक असे दरगाह हजरत पीर शहेनशहा वली र.अ. मंदिराचे बांधकाम करण्यात आले असून आतील बाजूस सुशोभिकरण पहाण्यासारखे आहे. दरगाह हजरत पीर शहेनशहा वली र.अ. उत्सव मोठया उत्साहाने साजरा करण्यात आला, या उत्सवाचे निमित्ताने मोठया संख्येने मुस्लिम व हिंदू भाविकांनी सदिच्छा भेट देवून दर्शनाचा लाभ घेतला.

या वेळी रेवदंडा पोलिस ठाणे सपोनि श्रीकांत किरविले,सरपंच प्रफुल्ल मोरे, प्रसाद गोंधळी, शरद गोंधळी, संतोष मोरे, शाबीर कुरेशी, हेमंत गणपत आदी मान्यवरानी सदिच्छा भेट दिली. रेवदंडयातील असिफ गोंडेकर, सलिम तांडेल, अनिस तांडेल, रफिक तांडेल, शौकत गोडेकर, झैद गोडेकर, इक्बाल फटाकरे, सुहास घोणे, सचिन पवार, दिपक वैद्य, शहारूख मेमन, मुझफर मुकादम, रवी वाडेकर, शहानवाज गोंडेकर आदीने विशेष परिश्रम घेतले.


### नोटीस

श्री राम समर्थ को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड (यापुढे सोसायटी म्हणून संदर्भित) **सर्व्हे नं. ७३/१५/फ आणि ७३/१५/ब** म्हातावली, गाव-उरण जि. रायगड येथे असलेल्या पुनर्विकासाच्या कामासाठी सीलबंद एकरकमी निविदा मागवण्यात आल्या आहेत. अनुभवी आणि साधनसंपन्न बांधकाम व्यावसायिकांकडून/विकासकाकडून निविदा मागत आहोत.

निविदा कागदपत्रे **२०/११/२०२४ ते २५/११/२०२४** पर्यंत कोणत्याही कामकाजाच्या दिवशी **सायं. ४.०० ते ७.००** च्या दरम्यान सोसायटी कार्यालयातून खरेदी करता येतील. निविदा कागदपत्रे खर्च रुपये ५०००/- (पाच हजार मात्र) रोख किंवा डी. डी./पे ऑर्डर श्री राम समर्थ सहकारी गृह निर्माण संस्थेच्या नावे द्यावे.

दिनांक ३०/११/२०२४ रोजी किंवा त्यापूर्वी सायं. ५.०० वाजेपर्यंत सोसायटी कार्यालयात रीतसर भरलेले आणि स्वाक्षरी केलेले सीलबंद निविदा फॉर्म व कागदपत्रे सादर करावित.

ठिकाण : उरण
दिनांक : १८/११/२०२४

**सही/-**
**सेक्रेटरी**
(श्री. भास्कर रामभाऊ पाटील)
दूरध्वनी क्रमांक - ९८३३६६४९४७

**सही/-**
**अध्यक्ष**
(श्री हरिभाऊ रामा नाईक)
दूरध्वनी क्रमांक: ९८२१०१५६४७

श्री राम समर्थ सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, म्हातवली, नागांव-उरण, जिल्हा रायगड - ४००७०२.

# मतदान केंद्रांवर बारकाईने लक्ष

## किमान सुविधा पूर्ततेबाबत विशेष बैठक

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीत नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील १५० ऐरोली व १५१ बेलापूर या दोन्ही विधानसभा मतदारसंघातील १७६ ठिकाणी असलेल्या ८३१ मतदान केंद्रांवर मतदारांना सुलभपणे मतदान करता यावे याकरिता आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या जातील याकडे बारकाईने लक्ष देण्याचे निर्देश नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी आश्वासित किमान सुविधा पूर्ततेबाबत विशेष बैठक घेत सर्व संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

या वेळी अतिरिक्त आयुक्त सुनील पवार, शहर अभियंता शिरीष आरदवाड तसेच इतर विभागप्रमुख, विभाग अधिकारी, कार्यकारी अभियंता प्रत्यक्ष व दृकश्राव्यप्रणालीद्वारे उपस्थित होते. नवी मुंबई महापालिका क्षेत्रात १५० ऐरोली विधानसभा मतदारसंघात ७९ ठिकाणी ४४७ मतदान केंद्रे व १५१ बेलापूर विधानसभा मतदारसंघात ९७ ठिकाणी ३८४ मतदान केंद्रे असून १५० ऐरोली मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी सुचिता भिकाने तसेच १५१ बेलापूर मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी अश्विनी पाटील यांच्या नियंत्रणाखाली सर्व मतदान केंद्रावर आवश्यक सुविधा पुरविण्यात येत आहेत.



यामध्ये महानगरपालिकाही संपूर्ण सहकार्य करीत असून निवडणूक विभागामार्फत महापालिकेच्या अधिकाऱ्यांकडे सोपविलेल्या निवडणूकविषयक कामाच्या विविध जबाबदाऱ्या नियोजनबध्द रितीने पार पाडल्या जात आहेत. या निवडणूकीत मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न केले जात असून 'स्वीप' कार्यक्रमांतर्गत वेगवेगळे उपक्रम राबविले जात आहेत.

आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यामध्ये महापालिकेने पुढाकार घेतला असून एनएमएमटी बसेस व बसस्टॉपवर बॅनरद्वारे मतदानाकरिता आवाहन करण्यात आले आहे तसेच ठिकठिकाणी पोस्टर्स, बॅनर्स, होर्डींग, सेल्फी स्टँड, स्वाक्षरी फलक लावण्यात आले आहेत. एनएमएमटी बसेस, कचरा वाहतुकीच्या घंटागाड्या, नाट्यगृह येथे जनजागृतीपर ध्वनिफिती प्रसारित करण्यात आल्या आहेत तसेच चित्रपटगृहांमध्ये व्हिडिओ क्लिप्स प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहेत. सोशल मिडीया हँडल्सवरून ग्राफिक्स तसेच मान्यवर कलावंतांच्या व्हिडिओ क्लिप्स प्रसारित करण्यात येत आहेत. यासोबतच पथनाट्य, फ्लॅश मॉब, मॅस्कॉट, सायकलवरून जनजागृती असे वेगळे उपक्रमही राबविले जात आहेत.

यासोबतच मतदान केंद्राच्या ठिकाणी पिण्याचे स्वच्छ व शुध्द बाटलीबंद पाणी याची उपलब्धता करून देणे, स्वच्छतागृहांची मतदान दिनांकापूर्वी १८ व १९ तारखांना सखोल स्वच्छता करणे, मतदान केंद्रांवरील मतदार संख्या लक्षात घेऊन तेथे आवश्यक तेवढी मोबाईल स्वच्छतागृहे उपलब्ध करून देणे, केंद्रांची अंतर्गत व परिसर स्वच्छता करणे, लाईट व पंखे यांची व्यवस्था करणे, सावलीसाठी मंडप तसेच बैठक व्यवस्थेकडे लक्ष देणे, दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिक यांच्याकरिता रॅम्प आणि व्हिलचेअर व्यवस्था याची खातरजमा करून घेणे, मतदान केंद्र परिसरात पार्कींग व्यवस्था ठेवणे व त्याचे फलक प्रदर्शित करणे, मतदान केंद्रांवरील रांगांच्या व्यवस्थापनासाठी १८ वर्षाखालील एनसीसी / एनएसएस विद्यार्थ्यांचे समुह ठेवणे, मतदान केंद्रांवर मार्गदर्शन करणाऱ्या बीएलओ यांची दर्शनी जागी बैठक व्यवस्था करणे अशा विविध बाबींकडे बारकाईने लक्ष देण्याचे निर्देश आयुक्त डॉ. शिंदे यांनी दिले.

# आमदार महेश बालदी यांच्या प्रचारार्थ उरणमध्ये बाईक रॅली



**उरण : वार्ताहर**

महायुतीचे लोकप्रिय उमेदवार महेश बालदी यांच्या प्रचारार्थ उरण तालुक्यात सोमवारी (दि.१८) भव्य बाईक रॅली काढण्यात आली. रॅलीला सुरुवात मोरा येथून सुरुवात झाली. उमेदवार आमदार महेश बालदी यांच्या उपस्थित सुरुवात झाली.

या बाईक रॅलीत हजारो भाजप कार्यकर्ते सहभागी झाले होते. त्यात उरण तालुका भाजप अध्यक्ष रवी भोईर, उपनगराध्यक्ष जयवीन कोळी, उरण शहर भाजप अध्यक्ष तथा माजी नगरसेवक कौशिक शाह, हितेश शाह, माजी नगरसेवक राजेश ठाकूर, भाजप उरण तालुका सरचिटणीस सुनील पाटील, हस्तीमल मेहता, दिनेश ठक्कर, मनन पटेल, अजित भिंडे, तनुज बालदी, संतोष ओटावकर, मकरंद पोतदार, मनोहर सहतीया, विशाल पाटेकर, चंद्रकांत घरत, पुरुषोत्तम सेवक, कुणाल शिसोदिया, मनोज ठाकूर, निलेश कदम, महेश घरत, सागर मोहिते, सविन म्हात्रे, मदन कोळी, राजेश कोळी, जगदीश पाटील, सचिन वैद्य, दिनेश पाटील, पप्पू कोळी, धार्मिक पटेल यांच्यासह शेकडो भाजप कार्यकर्ते सहभागी झाले होते.



## निवडक

### स्व. बाळासाहेब ठाकरेंना आदरांजली



**पनवेल :** हिंदूहृदयसम्राट शिवसेना पक्षप्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांना पनवेल शिवसेना उबाठा शाखेतर्फे आदरांजली वाहण्यात आली. या वेळी माजी नगरसेवक अच्युत मनोरे, शहर प्रमुख प्रवीण जाधव, उपशहर प्रमुख सुजन मुसलोंडकर, शहर संघटक अर्चना कुळकर्णी, तालुका संपर्क प्रमिला कुरुघोडे, उज्ज्वला गावडे, अश्विनी देसाई, माधवी त्रिवेदी, मयुर दसवते, राजेश शेट्टीगर, ज्येष्ठ शिवसैनिक अरुण ठाकूर, दत्तात्रेय फडके, कुणाल कुरघोडे आदी उपस्थित होते.

### लोकलच्या धडकेत एकाचा मृत्यू

**पनवेल :** खारघर रेल्वे स्टेशन फलाट क्रं.१ या ठिकाणी सीएसएमटी बाजुच्या टोकाकडे लोकलच्या धडकेत एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. रेल्वे पोलिसांनी बेशुध्दावस्थेतील व्यक्तीस उपचारासाठी उप जिल्हा रुग्णालय पनवेल येथे नेले असता डॉक्टरांनी उपाचारापूर्वीच त्या व्यक्तीचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. मृत व्यक्तीची उंची साडेपाच फूट असून रंग सावळा, चेहरा गोल असून अंगात हिरवे आणि काळे हाफ टी शर्ट व नेसणीस काळी हाफ पॅन्ट असून कमरेला लुंगी बांधलेली आहे. मयत व्यक्तीच्या नातेवाईकांचा पोलीस शोध घेत असून, या व्यक्तीबाबत कुणाला अधिक माहिती असल्यास रेल्वे पोलीस ठाणे फोन (०२२-२७४६७१२२) किंवा पीएसआय पी.बी.जगताप (९६८९३०९०३५) व स.पो.उप.निरीक्षक श्रीकृष्ण वेदपाठक (९८७०१५७८५०) येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# औद्योगिक क्षेत्रात मतदान जनजागृती



**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मध्ये मतदानाचे प्रमाण वाढावे याकरिता विविध माध्यमांतून मतदार जनजागृती करण्यात येत असून महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध घटकांशी थेट संवाद साधला जात आहे.

या अनुषंगाने नवी मुंबईतील १५० ऐरोली व १५१ बेलापूर या दोन्ही मतदारसंघाचे स्वीप नोडल अधिकारी तथा नमुंमपा अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांनी सहा. संचालक नगररचना सोमनाथ केकाण यांच्यासह महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या महापे येथील प्रादेशिक कार्यालयास भेट देत एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी महेंद्र पटेल यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित उद्योग समुहांच्या बैठकीप्रसंगी मतदान करणेविषयी उपस्थितांशी संवाद साधला.

यामध्ये त्यांनी विधानसभेची निवडणूक २० नोव्हेंबर रोजी होत असून यादिवशी उद्योगसमुहांमधील कामगार व कर्मचाऱ्यांना सुट्टी द्यावी व ज्या कर्मचाऱ्यांना सुट्टी देणे शक्य नसेल त्यांना मतदान करण्यासाठी वेळेची सवलत द्यावी, असे सूचित केले. त्याचप्रमाणे उद्योगसमुहात काम करणारे सर्वच्या सर्व १०० टक्के कर्मचारी व कामगार मतदानाचा हक्क बजावतील अशा प्रकारे उद्योजकांनी व कंपनी व्यवस्थापनाने त्यांना प्रोत्साहित करावे, असे आवाहन करतानाच अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांनी जे उद्योग, कारखाने आपल्या १०० टक्के अधिकारी, कर्मचारी यांचे मतदान करून घेतील त्यांचा महापालिकेमार्फत विशेष सन्मान करण्यात येईल असे सांगितले. त्याचप्रमाणे ७५ टक्केपेक्षा अधिक मतदान करणाऱ्या उद्योग, कंपन्यांनाही प्रशस्तिपत्रके प्रदान करण्यात येतील, असे सूचित करण्यात आले.

राज्यघटनेने दिलेला मतदानाचा हक्क बजावणे हे आपले राष्ट्रीय कर्तव्य असून त्याची जाणीव उद्योगात काम करणाऱ्या अधिकारी, कर्मचारी व कामगारांना करून देऊन त्यांना २० नोव्हेंबर रोजी मतदान करण्यासाठी प्रोत्साहित करावे व सवलत द्यावी, असे आवाहन या वेळी अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांनी केले. या वेळी उपस्थितांनी मतदानाची सामुहिक शपथ ग्रहण केली.

# बेलापूर मतदारसंघातील दिव्यांग मतदारांचे गृहमतदान

**नवी मुंबई : बातमीदार**

राज्यात विधानसभा निवडणुकीच्या मतदानाची प्रक्रिया होणार आहे. यासाठी निवडणूक आयोगाने दिव्यांग मतदारांसाठी गृह मतदार संकल्पना राबवत मतदानाची प्रक्रिया झाली.

देशाची लोकशाही मजबूत करण्यासाठी संविधानाने सर्व भारतीय नागरिकांना मतदानाचा हक्क दिला आहे. मतदार राजा त्यांना पाहिजे असलेला उमेदवार निवडून द्यावा याबाबत निवडणूक आयोग व प्रशासनाकडून जाहिरात तसेच विविध माध्यमातून जनजागृती करत असल्याचा पाहायला मिळते. अशातच दिव्यांग तसेच आजारामुळे अंथरुणावर खिळून असलेल्या मतदारांना सुद्धा त्यांच्या मतदानाचा हक्क बजावता आला पाहिजे, पण जे दिव्यांग व आजारी मतदार जे मतदान केंद्रापर्यंत पोहचू शकत नाहीत, अशा मतदारांसाठी गृह मतदानाची संकल्पना निवडणूक आयोगाने राबवल्याने अशा मतदारांना दिलासा मिळाला आहे.



भारतीय निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी बेलापूर मतदारसंघात ८५ पेक्षा जास्त वय असलेल्या व ४० टक्क्यांपेक्षा जास्त दिव्यंगत्व असलेल्या मतदारांसाठी गृह मतदान प्रक्रिया पार पाडण्याच्या अनुषंगाने, एकूण चार पथके नेमण्यात आली होती. १६ नोव्हेंबर रोजी गृह भेट देऊन ८५ पेक्षा अधिक वय असलेल्या ३६ मतदारांपैकी ३४ मतदारांचे मतदान पूर्ण झाले. तसेच ४० टक्क्यांपेक्षा जास्त दिव्यांग असलेल्या नऊ मतदारांपैकी आठ मतदारांचे मतदान पूर्ण झाले आहे. ८५पेक्षा जास्त वय असलेल्या दोन अनुपस्थितीत मतदारांपैकी एका मतदाराचे निधन झाले असून, एका मतदाराची प्रकृती ठीक नसल्याने रुग्णालयात दाखल असल्याचे त्यांच्या निकटवर्तीयांकडून माहिती मिळाली. तसेच ४० टक्क्यांपेक्षा जास्त दिव्यांग असलेले एक अनुपस्थितीत मतदाराची प्रकृती ठीक नसल्याने त्यांना रुग्णात दाखल केले असल्याने रविवारी (दि.१७) अनुपस्थितीत मतदारांची गृह मतदानाची प्रक्रिया पार पडणार असल्याचे निवडणूक अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

# गिरीजा असोसिएशनला रुग्णवाहिका भेट

**पनवेल : वार्ताहर**

अनाथ मुले आणि वृध्द व्यक्तींसाठी काम करणाऱ्या खारघर येथील 'गिरीजा वेल्फेअर असोसिएशन'च्या अनाथ आश्रम आणि वृध्दाश्रमला 'एलआयसी'च्या वतीने रुग्णवाहिका भेट देण्यात आली.

एलआयसी ठाणे पश्चिम क्षेत्रीय विभागाचे विभागाचे वरिष्ठ प्रबंधक सनोज कुमार यांच्या हस्ते रुग्णवाहिका वृध्दाश्रमच्या पदाधिकाऱ्यांना सुपूर्द करण्यात आली. या वेळी एलआयसी ठाणे विभागाचे वरिष्ठ प्रबंधक पी. के. बर्णवाल, विक्रिय प्रबंधक सचिन भामापूरकर, 'गिरीजा वेल्फेअर असोसिएशन'चे संस्थापक वसंत कुंजर आदी उपस्थित होते.

गिरीजा वेल्फेअर असोसिएशन गेल्या २० वर्षांपासून अनाथ मुलांसाठी वस्तीगृह आणि वृध्दांसाठी वृध्दाश्रम चालवत आहे. वसतिगृहात ३८ अनाथ मुले तर वृध्दाश्रमात २२० वयोवृध्द व्यक्ती आहेत. 'गिरीजा वेल्फेअर असोसिएशन'ला रुग्णवाहिका सुपूर्द करताना सनोज कुमार म्हणाले, 'एलआयसी'च्या विविध विमा पॉलिसी योजना चांगल्या आणि सुरक्षित आहेत. तसेच वृध्द मंडळी समाजाची संपत्ती असून कुटुंबातील सर्व सदस्यांनी घरातील वृध्द व्यक्तीची काळजी घेणे आवश्यक आहे, मात्र समाजात आधार नसलेल्या वृध्दांची 'गिरीजा आश्रम' मध्ये योग्य प्रकारे देखभाल केली जाते. 'गिरीजा फाऊंडेशन'च्या वृध्दाश्रमात जवळपास २० वृध्द व्यक्ती निवास करीत आहेत. त्यांना रुग्णालयात घेवून जाताना अनेक वेळा अडचण निर्माण होते.

यामुळे वृध्दांची चांगली सेवा व्हावी, रुग्णालयात उपचारासाठी सहजपणे त्यांना घेवून जाता यावे, त्यांना चांगली आरोग्य सेवा मिळावी, असे उद्देश समोर ठेवून 'गिरीजा वेल्फेअर असोसिएशन'ला जवळपास २२ लाख रुपये खर्चुन रुग्णवाहिका भेट देताना समाधान वाटत आहे, असेही सनोज कुमार यांनी सांगितले. या वेळी आश्रममधील वृध्द व्यक्ती आणि मुले उपस्थित होते.

# वीर वाजेकर महाविद्यालयात बिरसा मुंडा जयंती



**उरण : वार्ताहर**

फुंडे येथील वीर वाजेकर महाविद्यालयात शुक्रवारी (दि. १५) सांस्कृतिक समितीच्या वतीने धरती आबा बिरसा मुंडा जयंतीच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जयंतीनिमित्त डॉ. स्मिता तांदळे, रसायनशास्त्र विभाग प्रमुख यांनी आपल्या मनोगतातून बिरसा मुंडा यांचा जीवन परिचय व कार्याचा आढावा घेतला.

अत्यंत अभ्यासपूर्ण व मौलिक अध्यक्षीय मनोगतातून धरती आबा बिरसा मुंडा यांच्या जीवनकार्यावर प्र. प्राचार्य, डॉ.आमोद ठक्कर यांनी भाष्य केले. प्रास्ताविक व आभार डॉ. सुजाता पाटील यांनी मानले. उपप्राचार्य डॉ. विलास महाले, कार्यालयीन प्रमुख बाळकृष्ण दगडे तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक तसेच कार्यलयीन सेवक उपस्थित होते.

# अंश फडकेच्या प्रामाणिकपणाचे कौतुक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

करंजाडे येथील राजकीय प्रचार सभेदरम्यान सापडलेले तीन तोळे सोन्याचे ब्रेसलेट दहा वर्षीय अंश फडकेने प्रामाणिकपणे मूळ मालकाकडे सुपूर्द केले. अंशच्या या प्रामाणिकपणाबद्दल केंद्रीय सहकार आणि नागरी हवाई उड्डाण मंत्री मुरलीधर मोहोळ, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, खासदार श्रीरंग बारणे, आ. महेश बालदी, करंजाडेचे सरपंच मंगेश शेलार यांच्यासह उपस्थित सर्व मान्यवरांनी कौतुक करून पाठीवर शाब्बासकीची थाप दिली.



करंजाडे येथे उरण विधानसभा भाजप महायुतीचे उमेदवार आमदार महेश बालदी यांची शुक्रवारी (दि. १५) जाहीर सभा झाली. या सभेत पळस्पे येतील एका व्यक्तीचे तीन तोळे सोन्याचे ब्रेसलेट हरवले होते. दरम्यान, करंजाडे येथील रहिवाशी अंश फडके हा त्याची आई ग्रामपंचायत सदस्य प्रिया फडके यांच्यासमवेत प्रचारसभेला आला होता. दरम्यान, अंशला तेथील मैदानावर सोन्याचे ब्रेसलेट सापडले. त्यानंतर अंशने तात्काळ व्यासपीठावर जाऊन निवेदकाकडे ब्रेसलेट सुपूर्त केले व सदर सोन्याची वस्तू आपल्याला मैदानावर सापडल्याचे सांगितले. त्यानंतर सोन्याचे ब्रेसलेट त्याच्या मूळ मालकाकडे सुपूर्त करण्यात आले. अंश फडकेच्या प्रामाणिकपणाबद्दल उपस्थितांनी टाळ्या वाजवून कौतुक केले.

# भावासह पत्नी व मुले बेपत्ता; वावंजे परिसरात खळबळ

**पनवेल : वार्ताहर**

सख्ख्या भावासह पत्नी व दोन मुले बेपत्ता झाल्याने ती हरविल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली असली तरी या घटनेमुळे वावंजे परिसरात खळबख उडाली आहे.



वावंजे येथील भारत कंपाऊंडजवळ राहणारे रंजित यादव यांचा लहान भाऊ रूपेश यादव (वय ३४) उंची पाच फुट सात इंच रंग सावळा, केस काळे, नाक सरळ, बांधा मजबूत असून अंगात पांढर्या रंगाचा फुल बाह्याचा शर्ट व निळ्या रंगाची फुल पॅन्ट तसेच सोबत मोबाईल फोन आहे. त्याचप्रमाणे त्यांची पत्नी गीनादेवी यादव (वय ३०) उंची पाच फुट, केस काळे लांब, वर्ण गोरा, बांधा मध्यम, नाक सरळ, डाव्या बाजूला नथ असून अंगात लाल रंगाचा ब्लाऊज व निळ्या रंगाची साडी, सोबत मोबाईल फोन आहे. त्याचप्रमाणे त्यांचा १२ वर्षाचा रवि हा मुलगा उंची तीन फुट, बांधा सडपातळ, नाक छोटे, केस काळे असून, अंगात पांढऱ्या रंगाचा फुल बाह्याचा शर्ट व करड्या रंगाची कार्गो पॅन्ट तसेच ११ वर्षीय राधिका ही मुलगी उंची दोन फुट आठ इंच, वर्ण गोरा, केस काळे लांब, नाक सरळ, बांधा सडपातळ, अंगात काळ्या रंगाचा झगा घातलेला आहे.

हे चौघेही राहत्या घरातून कुठेतरी निघून गेल्याने ते हरविल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. याबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल तालुका पोलीस ठाणे (०२२-२७४५२४४४), (९५९४४३४९९९) किंवा सहा.पो.उप.मनोहर चव्हाण यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# दिघी येथील औद्योगिक क्षेत्रामुळे श्रीवर्धन मतदारसंघाचा कायापालट होणार

## खासदार सुनील तटकरे यांचा विश्वास



**रोहे : प्रतिनिधी**

सर्वाधिक उद्योगपतींची औद्योगिक गुंतवणूक महाराष्ट्रामध्ये आहे. सर्वाधिक परकीय गुंतवणूकसुद्धा राज्यात आहे. महाराष्ट्र संपन्नतेच्या वाटेवर जात असताना माझा रायगड जिल्ह्याचे बदललेले चित्र आपल्याला पहायला मिळेल. दिघी परिसरात १० हजार हेक्टरवर औद्योगिक क्षेत्र येणार आहे. यातून श्रीवर्धन मतदारसंघात रोजगाराची साधने उपलब्ध होतील. इथल्या दोन लाख मुलांना रोजगार मिळणार आहे, असे प्रतिपादन राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी केले.

श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघातील महायुतीच्या उमेदवार मंत्री आदिती तटकरे यांच्या प्रचारार्थ रोहा येथील राम मारुती चौकात सभा आयोजित करण्यात आली होती. त्या वेळी खासदार तटकरे बोलत होते.

या सभेस उमेदवार ना. आदिती तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे, प्रदेश सरचिटणीस विजयराव मोरे, जिल्हा सरचिटणीस सुरेश मगर, उपाध्यक्ष शंकरराव भगत, तानाजी देशमुख, तालुका अध्यक्ष विनोद पाशिलकर, नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, नितीन तेंडुलकर, उस्मान रोहेकर, दीपिका चिपळूणकर, राष्ट्रवादी शहर अध्यक्ष अमित उकडे, महिला अध्यक्ष प्राजक्ता चव्हाण, भाजप शहर अध्यक्ष यज्ञेश भांड, माजी नगरसेवक महेंद्र गुजर, अहमद दर्जी, राजेंद्र जैन, सुभाष राजे, महमद डबीर, मयुर दिवेकर, मानसी दाते, श्रद्धा पाटणकर, शिल्पा धोत्रे, रिद्वाना शेटे, अफरीन रोगे, जितेंद्र पडवळ आदी उपस्थित होते.

रोहा रेल्वेस्थानकाचे सुशोभीकरण, लांब पल्ल्याच्या गाड्या थांबा, क्रीडांगण, मल्टी स्पेशलिस्ट हॉस्पिटल, रोहा कोलाड, किल्ला भुवनेश्वरप्रमाणे हनुमान टेकडी येथे विद्युत रोषणाई, रोहा शहरातील सुसज्ज रस्ते आदी कामे रोह्याच्या विकासाचा मानबिंदू ठरणार असल्याचे खासदार सुनील तटकरे यांनी सांगितले.

या वेळी उमेदवार ना. आदिती तटकरे यांनी आपण सगळ्यांनी मला संधी दिली. या पाच वर्षाच्या कालावधीमध्ये आपल्या सगळ्यांचीच एक हक्काची लेक म्हणून मी जे जे काही करू शकले हे तुमच्या सर्वांचे आशीर्वाद व पाठबळ होते. नाहीतर पहिल्या टर्ममध्ये एखाद्या आमदाराला राज्यमंत्रीपद जिल्ह्याचे पालकमंत्रीपद आणि परत कॅबिनेट मंत्रीपद हे मिळणे हे खरंतर अशक्य आहे. ही या भूमीची पुण्याई आहे. आज आपल्या सगळ्यांचा आशीर्वाद घेण्यासाठी मी इथे आलेली आहे.

माजी आमदार अनिकेत तटकरे यांनी, निवडणुकीपुरते नाही तर सदैवपणे ३६५ दिवस आम्ही सर्व मंडळी काम करत असतो. प्रत्येकाच्या सुखदुःखामध्ये, अडीअडचणीमध्ये एक कुटुंब म्हणून आपण सर्वजण वावरत आलो. जेव्हा जेव्हा आम्हाला गरज पडली त्या वेळेस तुम्ही समस्त रोहेकर, अष्टमीकर आणि तालुक्यातील प्रत्येक नागरिक आमच्या मदतीसाठी धावून आले. ज्या ज्या वेळेस तुम्हाला आमच्याकडे काही अपेक्षा होत्या त्या वेळी काही अंशी पूर्ण करण्यामध्ये आम्ही निश्चितच प्रयत्न केले. रोहा शहरातून पाच हजारांचे मताधिक्य आदिती तटकरे मिळेल, अशा विश्वास मी या ठिकाणी व्यक्त करतो.

नगराध्यक्ष संतोष पोटफोडे यांनी, या सभेला महिलांची गर्दी जास्त आहे. या महिलांचे प्रेम अदिती तटकरे यांच्यावर जास्त आहे. रोहा शहराचा विकासाचा विचार खासदार सुनील तटकरे, आदिती तटकरे व अनिकेत तटकरे हे नेहमीच करत असल्याचे सांगितले. सुरेश मगर, यज्ञेश भांड, निसार मोर्बेकर, नितीन तेंडुलकर आदींनीही मनोगत व्यक्त केले. सभेचे प्रास्ताविक अमित उकडे यांनी, तर सूत्रसंचालन प्रतीक राक्षे यांनी केले.

# शिवसेनेचे धनुष्यबाण विजयाचे चिन्ह; मंत्री होऊन जनतेची सेवा करणार

## आमदार भरत गोगावले यांचा विश्वास



**पोलादपूर : प्रतिनिधी**

महाड विधानसभा मतदारसंघातील निजामपूर भागातील रवाळजेपासून पोलादपूर तालुक्यातील कामथे, कुडपणपर्यंतच्या सर्वच गावांत विकासकामे केल्याने सर्वच गावांची नावे तोंडपाठ सांगू शकतो. सोबत असलेल्या आणि विरोधकांना मिळालेल्या कार्यकर्त्यांचीही नावे सांगू शकतो. आयुष्यात समाजकारण केल्याने नेहमीच विजयी होत आलो. शिवसेनेचे धनुष्यबाण हे चिन्ह विजयाचे प्रतीक असून या वेळी नक्की मंत्रीपदाद्वारे जनतेच्या सेवेची संधी मिळणार असल्याचा विश्वास आमदार भरत गोगावले यांनी व्यक्त केला.

पोलादपूर तालुक्यातील पितळवाडी येथे आयोजित सभेमध्ये महायुतीचे उमेदवार आमदार गोगावले बोलत होते. या वेळी कामथी ढवळी सावित्री खोऱ्यातील जनतेची प्रचंड गर्दी उपस्थित असल्याचे दिसून आले. सभेला जि.प. चे माजी उपाध्यक्ष चंद्रकांत कळंबे, तालुकाप्रमुख निलेश अहिरे, भाजप जिल्हा उपाध्यक्ष मनोज भागवत, तालुका अध्यक्ष तुकाराम केसरकर, माजी तालुकाप्रमुख अनिल मोरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर अध्यक्ष अजित खेडेकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक लक्ष्मण मोरे, ज्येष्ठ शिवसैनिक शांताराम गोळे, वारकरी संप्रदायाचे हभप भगवानमहाराज कोकरे, संपर्कप्रमुख किशोर जाधव व अन्य उपस्थित होते.

जि.प. चे माजी उपाध्यक्ष चंद्रकांत कळंबे यांनी, गेल्या काही वर्षांपासून राष्ट्रीय जलजीवन मिशनच्या माध्यमातून महिलावर्गाचा डोक्यावरचा हंडा उतरविण्याचे काम आमदार गोगावले यांच्या माध्यमातून झाले असल्याचे सांगतानाच जिल्हा नियोजन मंडळाच्या माध्यमातून रस्ते, पाणी, आरोग्य व शिक्षणाचे प्रश्न सोडविण्यात आमदार गोगावले आणि आम्ही सातत्याने प्रयत्न केले. लहुळसे भागातील औष्णिक ऊर्जा प्रकल्पासाठी पाठपुरावा करण्यात आला असून तालुक्याचा विजेचा प्रश्न कायमचा दूर होणार आहे. असे असताना आमदार गोगावले यांच्या माध्यमातून होणारी कामे विरोधकांना दिसत नाहीत काय, असा सवालही त्यांनी केला.

वारकरी संप्रदायाचे हभप भगवानमहाराज कोकरे यांनी, आमदार भरतशेठ गोगावले हे धर्माचे काम करणारे कार्यकर्ते आहेत, शिवछत्रपतींचे मावळे आहेत. भगवी पताका खांद्यावर घेऊन मिरवताना रयतेची काळजी घेणारे नेतृत्वदेखील ते असल्याने केंद्रात ज्या प्रमाणे पंतप्रधान मोदी प्रभू श्री रामचंद्रांच्या मंदिराच्या उभारणीमुळे युगानुयुगे लक्षात राहतील, त्याचप्रमाणे आमदार भरतशेठदेखील शिवविचार आचरणात आणून करीत असलेल्या शिवभक्तीमुळे सर्वसामान्यांच्या कायम लक्षात राहतील, असे सांगितले. त्यांना मंत्री होण्यासाठी निवडून द्यायचे आहे, असेही ते म्हणाले.

भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष मनोज भागवत यांनी, राज्यातील महायुती सरकारचे गेल्या दोन अडीच वर्षांतील जनसेवेचे काम असल्याने आणि आमदार गोगावले यांनी या सरकारमध्ये महत्वपूर्ण भूमिका बजावल्यामुळे येत्या सरकारमध्ये ते पहिल्याच शपथ विधीवेळी मंत्री होतील, असा विश्वास व्यक्त केला.

कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक लक्ष्मण मोरे यांनी, आमदार गोगावले हे गरीबांचे देव असून महाड विधानसभा मतदारसंघात विकासकामे आणि जनतेच्या गोरगरीबांच्या थेट उपयोगी पडणाऱ्या या नेत्यामुळे अनेक संसारांना मदतीचा हातभार लागल्याचे सांगून मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेच्या लाभार्थी महिलांनी हात वर करून आमदार गोगावले यांना पाठिंबा असल्याचे दर्शविण्यास सांगितले. माजी तालुकाप्रमुख अनिल मोरे यांनी आमदार गोगावलेंनी बहुजन समाजासाठी केलेल्या कामांचा आढावा घेत संपूर्ण समाज त्यांच्या पाठिशी ठाम राहणार असल्याचे सांगितले.

## मोर्बा घाटात अपघात; तीन जण जखमी

**माणगाव : प्रतिनिधी**

मोटरसायकल व दोन कारमध्ये विचित्र अपघात होऊन तीन जण जखमी झाल्याची घटना मोर्बा घाटात घडली आहे. या अपघात दुचाकीवरून प्रवास करणारे तीन जण जखमी झाले असून तिन्ही वाहनांचे नुकसान झाले आहे.



पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार शनिवारी दुपारी २च्या सुमारास सचिनकुमार राऊत हे त्यांची पत्नी वेदिका व मुलगी रित्वी यांच्यासह मोटरसायकल (एमएच १५-एफ ई) स्वतः चालवत घेऊन जात होते. मोर्बा घाटात वळणवर माणगाव-म्हसळा रोडवर आल्यावेळी समारून येणाऱ्या कार (एमएच ०२-डीएन ३२९५)चा चालक आयुब युसुफ शरिफ (वय ३५, रा. मुंबई) रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष दुचाकीस धडक दिली. त्यामुळे दुचाकी मागून येणाऱ्या दुसऱ्या कारला (एमएच १२-एमबी ६१५६) धडकली. या अपघाताची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

## आमदार दळवी विजयी होणार -अमित नाईक

**अलिबाग** : महायुतीचे अलिबाग मुरूड मतदारसंघातील उमेदवार आमदार महेंद्र दळवी भरघोस मतांनी विजयी होतील, असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे मतदारसंघ अध्यक्ष अमित नाईक यांनी पक्षाच्या बैठकीत व्यक्त केला.

आमदार दळवी यांनी विविध विकासकामांना खऱ्या अर्थाने चालना दिली. केलेल्या कामांची पोहचपावती मतांच्या आशीर्वादाने मतदार देतील, असेही नाईक यांनी सांगितले.

# मतदानाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात प्रतिबंधात्मक आदेश जारी; प्रशासनाची खबरदारी

**रायगड : रामप्रहर वृत्त**


महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीकरिता रायगड जिल्ह्यातील सात विधानसभा मतदारसंघांमध्ये २० नोव्हेंबर रोजी मतदान प्रक्रिया होणार आहे. या निवडणुकीच्या अनुषंगाने निकाल जाहीर होईपर्यंत आचारसंहिता अमलात राहणार असून निवडणूक खुल्या व निर्भय वातावरणात पार पाडणे तसेच मतदारांना आपल्या मतदानाचा हक्क निर्भयपणे बजावता येणे आवश्यक आहे. त्याकरिता भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३चे कलम १६३प्रमाणे बंदी आदेश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी जारी केले आहेत.

या आदेशान्वये मतदान समाप्तीकरिता निर्धारित केलेल्या वेळेच्या ४८ तास अगोदरच्या कालावधीमधे विशिष्ट कृती करण्यास मनाई करण्यात आली आहे. यामध्ये पाचपेक्षा जास्त व्यक्तींनी एकत्र जमण्यास किंवा फिरण्यास मनाई आहे. निवडणूक प्रचार करणे, सार्वजनीक सभा, बैठका घेणे इत्यादी कृतीस मनाई आहे. (तथापी घरोघरी भेटी-प्रचारास मनाई नाही).

राजकीय प्रचार करण्याच्या उद्देशाने बल्क मेसेज करण्यास मनाई आहे. ज्या मतदार संघात मतदान होणार आहे तेथे मतदार नसलेले राजकीय कार्यकर्ते, नेते यांना त्या मतदारसंघात थांबणेस मनाई आहे. लाउडस्पीकर वापरास मनाई आहे.

मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात कोणत्याही व्यक्तीस मोबाईल फोन, वायरलेस किंवा इतर संपर्क साधने घेऊन जाण्यास मनाई आहे. (निवडणुकीशी संबंधीत कामाकरिता व सुरक्षेकरिता नियुक्त केलेले अधिकारी, कर्मचारी वगळून).

मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात लाउडस्पीकर, मेगाफोन वापरणे, आरडाओरड करणे, गोंधळ घालणे, गैरवर्तन करणे इत्यादी कृती करण्यास मनाई आहे. मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात कोणत्याही व्यक्तीस शस्त्र घेऊन जाण्यास मनाई आहे. (अपवाद- मतदान केंद्राच्या सुरक्षेकरिता नियुक्त केलेले अधिकारी, कर्मचारी, ज्या व्यक्तीस एसपीजी, झेड+ दर्जाची सुरक्षा पुरविण्यात आली आहे. अशा व्यक्तीस साध्या वेशात एक सुरक्षा रक्षक शस्त्र लपवलेल्या स्थितीत घेऊन जाता येईल).



मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात आस्थापना चालू ठेवण्यास मनाई आहे. मतदारांना देण्यात येणारी चिठ्ठी पांढऱ्या कागदावर असावी. त्यावर कोणत्याही उमेदवाराचे नाव, पक्षाचेचिन्ह, पक्षाचे नाव नसावे.

मतदान केंद्राच्या परिसरात पक्षाचे कार्यकर्त्यांचे निवासस्थाने असल्यास त्या ठिकाणी प्रचार करणे, बैठका घेणे, मतदानाकरिता जाणाऱ्या मतदारांवर प्रभाव पाडण्यासाठी कोणतेही कृत्य करण्यास मनाई आहे.

मतदान केंद्राच्या २०० मीटर परिसरात कोणत्याही व्यक्तीस वाहन आणण्यास मनाई आहे. (अपवाद अपंग, वृध्द, आजारी मतदारांना घेऊन येणारी वाहने). मतदान केंद्राच्या २०० मीटर परिसराच्या आत राजकीय पक्षांचे, उमदवारांचे निवडणूक बूथ लावण्यास मनाई आहे.

मतदान केंद्राच्या २०० मीटर बाहेर निवडणूक बूथ लावताना अटींचे पालन करावे. बूथ लावण्याकरिता स्थानिक स्वराज्य संस्थेची परवानगी घ्यावी व बूथ लावण्याबाबत निवडणूक निर्णयअधिकारी यांना आगावू माहिती द्यावी. प्रत्येक बूथवर कमाल एक टेबल, दोन खुर्चा असाव्यात. बुथकरिता लावलेल्या मंडपाचा आकार १० बाय १० फुटापेक्षा जास्त नसावा.

प्रचार कालावधी संपल्यानंतर राजकीय पक्ष प्रचाराला भरीव चालना देण्यासाठी मतदारसंघाच्या बाहेरुन पाठीराख्यांना आणण्यासह त्यांच्या सर्मथकांची हलवाहलव करतात. ही वस्तुस्थिती लक्षात घेता प्रचार कालावधी संपल्यानंतर, मतदारसंघात कोणताही प्रचार होऊ नये यासाठी, मतदारसंघाच्या बाहेरुन आणलेले आहेत व जे त्याच्या वा तिच्या मतदारसंघाचे मतदार नाहीत असे राजकीय कार्यकर्ते, पक्ष कार्यकर्ते, मिरवणुकीतील कार्यकत, प्रचार कार्यकर्ते, इत्यादीना नियमितपणे मतदारसंघामध्ये उपस्थित राहता येणार नाही, कारण प्रचार संपल्यानंतर त्यांच्या निरंतर उपस्थितीमुळे मुक्त व निष्पक्ष मतदानाचे वातावरण धोक्यात येऊ शकते. सबब उमेदवाराच्या प्रचाराशी संबंधित जिल्ह्याबाहेरील व्यक्तींना जिल्ह्यात राहता येणार नाही, असे निवडणूक आयोगाचे निर्देश आहेत.

जिल्ह्यातील सर्व हॉटेल, रिसॉर्ट, गेस्ट हाऊसेस, लॉजिंग बोर्डिंग, होम स्टे इत्यादी ठिकाणी जिल्ह्याबाहेरील सदर व्यक्तींना प्रवेश देता येणार नाही. या आस्थापना चालकांनी त्यांच्याकडे प्रवेश केलेल्या व्यक्तींची सविस्तर माहिती संबंधित पोलीस ठाण्याला दर तासाने व्हॉट्सअॅप व ई-मेलव्दारे सादर करावी. पोलीस यंत्रेणेने या आस्थापनांची निवडणूक प्रक्रिया संपेपर्यंत सतत कडक तपासणी करावी.

मनाई आदेश रायगड जिल्ह्याच्या हद्दीतील (पोलीस अधीक्षक कार्यक्षेत्रात) विधानसभा मतदारसंघाच्या हद्दीत १८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजल्यापासून ते २० नोव्हेंबरपर्यंत रोजी सायंकाळी ७ वाजेपर्यंत अंमलात राहील. या मनाई आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीविरुध्द भारतीय न्याय न्यायसंहिता, २०२३चे कलम २२३नुसार कायदेशीर कारवाई केली जाईल, असेही जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी कळविले आहे.

## मुरूड बीच शोचे उद्घाटन

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड समुद्र किनाऱ्यावर शनिवारी (दि.१६) मुरूड बीच शोला शानदार सुरुवात झाली. हा कार्यक्रम पाहण्यासाठी पर्यटकांसह मुरूडकरांनी गर्दी केली होती. या वेळी स्थानिक कलाकारांसह आलेल्या पर्यटकांपैकी कलाकारांनीही आपली कला सादर करत गाण्यांवर थिरकत ठेका घेतला.

समुद्र किनाऱ्यावर गेल्या वर्षीपासून दर शनिवार आणि रविवारी हा कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे. योगश पवार यांनी या कार्यक्रमाची धुरा सांभाळली आहे. गायक लाभेश पाटील, मोनिका पाटील यांनी आपल्या गाण्यांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले, तर सारथी माळी, भूषण सुतार, जीवन पवार, तेजस माळी यांच्या वाद्याच्या तालावर पर्यटक थिरकले.

ज्येष्ठ छायाचित्रकार सुधीर नाझरे यांच्या हस्ते या शोचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी पत्रकार राजन वेलकर, रायगड प्रेस क्लबचे माजी अध्यक्ष भारत रांजणकर, उपाध्यक्ष मोहन जाधव, वरिष्ठ पत्रकार हर्षद कशाळकर, राजेश भोस्तेकर आदींची उपस्थिती लाभली. अनिकेत काठे आणि आदित्य बोर्लीकर यांचे या कार्यक्रमाला सहकार्य लाभले.



## ‘आदिवासींच्या समस्या सोडवणार’

**तळा : रामप्रहर वृत्त**

तळा तालुक्यातील आदिवासी बांधवांच्या समस्या सोडवणार, असे श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघातील काँग्रेस पुरस्कृत अपक्ष उमेदवार राजाभाऊ ठाकूर यांनी तळा परिसरातील आदिवासी बांधवांच्या बैठकीत सांगितले.

माझे वडील काँग्रेस नेते माजी आमदार स्व. मधुकर ठाकूर यांनी आदिवासी बांधवांसाठी मोलाचे सहकार्य केले आहे. अनेकांना आर्थिक साह्य केले आदिवासी बांधवांची उन्नती व्हावी यासाठी त्यांना मोलाचे सहकार्य आहे. आज त्यांचेच विचार घेऊन मी पुढे जात आहे. आपल्या हक्काच्या माणसाला येत्या २० तारखेला दहाव्या क्रमांकावर असलेल्या लिफाफा या चिन्हासमोरील बटन दाबून मतांचा आशीर्वाद द्यावा, असे आवाहन राजाभाऊंनी केले.

## केईएस स्कूलमध्ये कायदेविषयक मार्गदर्शन

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत येथील केईएस इंग्लिश मिडियम स्कूल या शाळेत तालुका विधी सेवा समिती कर्जत व कर्जत विधी बार असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमानाने कायदेविषयक जनजागृती व मार्गदर्शनपर शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

कर्जत न्यायालयातील दिवाणी न्यायाधीश ए.एस. वाडकर यांचा अध्यक्षतेखाली शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी अॅड. कैलास मोरे, अॅड. मनोज क्षीरसागर, अॅड. ज्योत्स्ना घारे-जाधव, अॅड. चंदा गौळकर-खापने, अॅड. तुषार भवारे, संस्थेचे चेअरमन डॉ. अनिरुद्ध जोशी, सेक्रेटरी प्रवीण गांगल, खजिनदार मदन परमार, सदस्य श्रीकांत मनोरे, सतीश पिंपरे, पर्यवेक्षक सुनील बोरसे आदी उपस्थित होते.



मुख्याध्यापिका अनुपमा चौधरी यांनी उपस्थितांचे स्वागत केले. सचिव प्रवीण गांगल यांनी प्रास्ताविक केले. या शिबिरात सायबर क्राईम, कॉन्स्टिट्यूशन डे, चिल्ड्रन्स डे, राइट्स ऑफ चिल्ड्रन, नॅशनल एज्युकेशन डे इत्यादी विषयांवर मोलाचे मार्गदर्शन करण्यात आले. मोबाईलचा अतिवापर केल्याने होणारे दुष्परिणाम यासंबंधी देखील माहिती देण्यात आली.


सध्या सायबर गुन्ह्यांमध्ये हॅकिंग हा सायबर गुन्हा अतिशय मोठ्या प्रमाणात सर्वत्र दिसून येतो. या व अशा अनेक गुन्ह्यांपासून आपल्याला कसे वाचता येईल या संदर्भात मोलाचे मार्गदर्शन केले. प्रत्येक मूल शिकला पाहिजे या यासाठी कायद्यात अनेक तरतुदी करून ठेवलेल्या आहेत. आजचा प्रत्येक विद्यार्थी हा उद्याचा उज्वल देशाचा भावी नागरिक असणार आहे यासाठी प्रत्येक मुलाने शिकून स्वतःची व देशाची प्रगती करणे गरजेचे आहे. यासाठी कायदा नेहमीच भारतातील प्रत्येक मुलाच्या पाठीशी असणार आहे असेही त्यांनी या शिबिरात सांगितले. या वेळी विद्यार्थी, शिक्षक व पालक उपस्थित होते.

## अमित ठाकरेंसाठी कुलदैवत पूजा व यज्ञ

**पाली : प्रतिनिधी**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सार्वत्रिक विधानसभा निवडणुकीत राज्यात आपले उमेदवार निवडणूक रिंगणात उतरवले आहेत. यात राज यांचे चिरंजीव तथा मनसे नेते अमित ठाकरे हे माहीम मतदारसंघातून पहिल्यांदा निवडणूक लढवत आहेत. ते विजयी व्हावे यासाठी ठाकरे घराण्याची कुलदेवता श्री कोंडजाई देवी, नागशेत (पाली) येथे कुलदैवत पूजा आणि यज्ञ सोहळा पार पडला.

मनसे रोहा तालुका अध्यक्ष साईनाथ धुळे यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम झाला. या वेळी जिल्हा उपध्यक्ष संदीप ठाकूर, महिला सेना रोहा तालुका अध्यक्ष दिपश्री घासे, विद्यार्थी सेना सुधागड तालुका अध्यक्ष भावेश बेलोशे, प्रभाकर तांडेल, सागर कदम, नरेश भंडारी, आदेश पारंगे, रोशन बावकर, सचिन पारंगे, अर्जुन यादव तसेच पुजेसाठी यजमान दाम्पत्य संजय कदम व पल्लवी कदम उपस्थित होते.



# प्रचाराच्या तोफा थंडावल्या

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात विधानसभेच्या सात मतदारसंघातील निवडणुकीचा प्रचार सोमवारी (दि. १८) सायंकाळी ६ वाजता थांबला. सर्व राजकीय पक्षांकडून २० दिवस प्रचार करण्यात आला. जाहीर सभा, चौकसभा झाल्या. आरोप-प्रत्यारोप झाले. या प्रचाराच्या तोफा थंडावल्या असून आता २० तारखेला होणाऱ्या मतदानाची तयारी सुरू झाली आहे.

रायगडात सात जागांसाठी ७३ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. मागील काही दिवसांमध्ये प्रचाराचा वेग वाढल्याचे दिसून आले. सभा, रॅलींचे आयोजन करण्यात आले होते. १७ नोव्हेंबर हा प्रचाराच्या दिवसातील शेवटचा रविवार होता. रविवारच्या सुट्टीची संधी साधत जिल्ह्यात सर्वच मतदारसंघांमध्ये प्रचारफेरींवर भर देण्यात आला. या माध्यमातून कमी वेळात जात मतदारांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्याचबरोबर उमेदवार तसेच त्यांच्या कार्यकर्त्यांनी घरोघरी जाऊन मतदारांशी संबंध साधून प्रचारपत्रांचे वाटप केले.

प्रचाराच्या कालावधीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची खारघर येथे सभा झाली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची पेणमध्ये तोफ धडाडली. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांची म्हसळ्यात, तर युवासेनेचे आदित्य ठाकरे यांची महाड व मोहोपाडा येथे सभा झाली. शेवटच्या दिवशी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख व माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची कर्जत येथे सभा झाली.

उमेदवारांनी ग्रामीण भागात मतदारांच्या गाठीभेटींवरच भर दिला. भारतीय जनता पक्ष, शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शेकाप व इतर पक्षांच्या उमेदवारांनी गावभेटी, घरोघरी मतदारांशी संवाद साधला.

अखेर विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या तोफा सोमवारी संध्याकाळी थंडावल्या. बुधवारी राज्यभरातील २८८ जागांवर मतदान होत आहे. त्याआधी ४८ तास म्हणजेच सोमवारी संध्याकाळी सहा वाजेपर्यंत प्रचार करण्याची संधी उमेदवारांना होती. या प्रचाराच्या काळात महायुती आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या झंझावती सभा झाल्या. महिनाभरापासून राज्यात सर्वच उमेदवारांनी आणि पक्षांनी मैदानात उतरून जोरदार प्रचार केला. रॅली, सभा, घोंगडी बैठका, कोपरा सभा, बाइक रॅली, घरोघरी भेटी, गावभेटींसह राज्यात प्रचाराचा धुरळा उडाला होता. आता मतदान स्लिप वाटण्याच्या निमित्ताने कार्यकर्ते मतदारांच्या गाठीभेटी घेतील.

## मतदानासाठी विविध उपाययोजना

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी येत्या २० नोव्हेंबर रोजी मतदान, तर २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. या निवडणुकीसाठी मुक्त वातावरणात, निष्पक्ष आणि शांततेत मतदान पार पडावे यासाठी पोलीस यंत्रणा सज्ज असून महाराष्ट्र पोलिसांनी विविध उपाययोजना केल्या असल्याची माहिती राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली.

निवडणूक कालावधीत बंदोबस्तासाठी सीएपीएफ, एसएपी, एसआरपीएफ कंपन्या उपलब्ध आहेत. पोलीस अंमलदार आणि होमगार्डसुद्धा तैनात करण्यात आलेले आहेत. गुन्हेगार, असामाजिक घटक, कायदा व सुव्यवस्थेशी संबंधित समस्या निर्माण करणाऱ्यांविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.

# वैदू समाज विकास फाउंडेशनचा आमदार प्रशांत ठाकूर यांना पाठिंबा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य अखिल महाराष्ट्र वैदू समाज विकास फाउंडेशनने महायुतीचे उमेदवार व कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांना विधानसभा निवडणुकीसाठी जाहीर पाठिंबा दिला आहे. या संदर्भातील पाठिंबापत्र फाउंडेशनचे महाराष्ट्र अध्यक्ष प्रदीप गुडे आणि रायगड जिल्हाध्यक्ष संदेश कर्नाटकी यांनी सोमवारी (दि. १८) माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडे सुपूर्द केले.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी नेहमीच विकासाला प्राधान्य देत जनतेची सेवा करण्याचे काम केले आहे. त्यामुळे अखिल महाराष्ट्र वैदू समाज विकास फाउंडेशनने आपला पाठिंबा आमदार प्रशांत ठाकूर यांना जाहीर केला आहे. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक अ‍ॅड. मनोज भुजबळ यांच्यासह फाउंडेशनचे सदस्य उपस्थित होते.

## बँगो सम्मिलानी सामाजिक संस्थेची साथ

**पनवेल** : खारघर येथील बँगो सम्मिलानी सामाजिक संस्थेने महायुतीचे उमेदवार व लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांना आपला पाठिंबा जाहीर केला आहे. या संदर्भातील पत्र संस्थेचे अध्यक्ष तपन कुमार सरकार व पदाधिकाऱ्यांनी दिले.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडे व्हीजन आहे. त्यांचा दृष्टिकोन समाजहिताचा आहे. त्यांनी आमदार म्हणून केलेले काम उत्कृष्ट आहे. मतदारसंघाची विकासात्मक प्रगती; त्याचबरोबर सामाजिक, आरोग्य, शिक्षण क्षेत्रातील कामगिरी मोठी आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांच्यामुळे या मतदारसंघाचा अधिक विकास होणार आहे, त्यामुळे पुन्हा ते विजयी झाले पाहिजेत आणि यासाठी त्यांना पाठिंबा जाहीर केल्याचे या संस्थेच्या वतीने दिलेल्या पाठिंबापत्रात नमूद करण्यात आले आहे.

# पनवेल कोळीवाड्यातील ‘उबाठा’चे कार्यकर्ते भाजपमध्ये



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल विधानसभा निवडणुकीच्या मतदानासाठी अवघे काही तास शिल्लक असताना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला पनवेलमध्ये जोरदार धक्का बसला आहे. पनवेल कोळीवाड्यातील ‘उबाठा’च्या अनेक कार्यकर्त्यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांचे सक्षम नेतृत्व स्वीकारत भारतीय जनता पक्षामध्ये सोमवारी (दि. १८) जाहीर प्रवेश केला. या सर्व प्रवेशकर्त्यांचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भाजपची शाल देऊन पक्षात स्वागत केले.

पनवेलचे कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांनी नेहमीच विकासाला प्राधान्य देत काम केले आहे. त्यांच्या या कार्यप्रणालीवर आकर्षित होऊन पनवेल कोळीवाड्यातील आकाश भोईर, नितीश भगत, अरुण पाटील, सागर भोईर, योगेश पाटील, सागर भोईर, आंबू, योगेश शेलार, संकेत भोईर, महेश भोईर,योगेश भगत, निवेश भगत, शंकर भोईर, जगदीश शेलार, संजय भगत, नरेश भोईर, गणपत भोईर, महेंद्र पाटील, शुभम भोईर, सुनील भगत, अनिकेत भगत, राज भगत, सागर भगत, यशवंत भोईर, दुर्गेश शेलार, यज्ञेश भगत, रवी भोईर, कौशिक भगत, मयुर भोईर, अनिल शेलार, पवन भगत, महेंद्र भगत, सोमनाथ भोईर, नितीन भोईर, धीरज भोईर यांनी भाजपमध्ये प्रवेश केला.

या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, माजी नगररसेविका दर्शना भोईर तसेच गणेश भगत, हरिश्चंद्र भगत, रोशन ठाकूर, राकेश भोईर यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# कामोठ्यातील निर्भय फोरमचेही समर्थन



गेल्या पाच वर्षांपासून कामोठ्यामध्ये कार्यरत असलेल्या निर्भय फोरमने महायुतीचे उमेदवार व कार्यतत्पर आमदार प्रशांत ठाकूर यांना निवडणुकीसाठी आपला पाठिंबा दिला आहे.

कामोठ्यात झालेल्या बैठकीमध्ये निर्भय फोरमच्या पदाधिकाऱ्यांनी याबाबत घोषणा केली. आमदार प्रशांत ठाकूर यांनी सर्वसामान्य नागरिकांना न्याय मिळवून देण्याचे काम केले आहे. नागरिकांना विविध सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टिकोनातून त्यांचे काम महत्त्वपूर्ण आहे. त्यामुळे या निवडणुकीसाठी त्यांना फोरमने हा पाठिंबा जाहीर केला. या वेळी भाजपचे जिल्हा सरचिटणीस अ‍ॅड. प्रकाश बिनेदार, उपाध्यक्ष के.के. म्हात्रे यांच्यासह फोरमचे पदाधिकारी उपस्थित होते.

# हर्षित राणा की प्रसिद्ध कृष्णा?

## बॉर्डर-गावसकर ट्रॉफी पहिल्या सामन्यासाठी चुरस



**पर्थ : वृत्तसंस्था**

भारत विरूद्ध ऑस्ट्रेलिया संघात पाच सामन्यांची बॉर्डर-गावसकर ट्रॉफी ही स्पर्धा खेळली जाणार आहे. त्यासाठी दोन्ही संघ पर्थच्या मैदानावर सराव करत आहे. दोन्ही संघातील पहिला सामना २२ नोव्हेंबरपासून पर्थच्या मैदानावर खेळला जाणार आहे. रिपोर्ट्सवर विश्वास ठेवला तर जसप्रीत बुमराह रोहितच्या अनुपस्थितीत कर्णधार होऊ शकतो. भारताच्या प्लेइंग इलेव्हनबद्दल बोलायचे झाल्यास हर्षित राणाला पदार्पणाची संधी मिळू शकते. त्याच्यासोबत प्रसिद्ध कृष्णाही प्रबळ दावेदार आहे.

हर्षित राणाची उत्कृष्ट कामगिरी देशांतर्गत सामन्यांमध्ये दिसून आली आहे. वेगवान गोलंदाज म्हणून त्याने १० प्रथम श्रेणी सामन्यांमध्ये ४३ विकेट्स घेतल्या आहेत. हर्षितची सर्वोत्तम कामगिरी म्हणजे एका डावात ४५ धावांत सात विकेट्स घेणे. त्याने लिस्ट ए मध्ये २२ विकेट्स घेतल्या आहेत. आता तो भारतीय संघासाठी कसोटी पदार्पण करू शकतो. संघ व्यवस्थापन हर्षितवर विश्वास व्यक्त करू शकतात. त्याला भारताच्या प्लेइंग इलेव्हनमध्ये स्थान मिळू शकते.

भारतीय संघाच्या प्लेइंग इलेव्हनमध्ये जसप्रीत बुमराह आणि मोहम्मद सिराजचे स्थान निश्चित आहे. यासोबतच हर्षित किंवा प्रसिद्ध कृष्णाची निवड करावी लागेल. प्रसिद्ध कृष्णाने भारतासाठी आतापर्यंत दोन कसोटी सामने खेळले आहेत. यादरम्यान त्याने दोन विकेट्स घेतल्या, तर २१ प्रथम श्रेणी सामन्यात ७५ विकेट्स आपल्या नावावर केल्या आहेत.

# श्रीलंकेचा ‘विजयी षटकार’

## मायदेशात सलग सहाव्या मालिकेत यश



**पल्लेकेले : वृत्तसंस्था**

पल्लेकेले येथील पीएलए स्टेडियमवर पावसाने प्रभावित झालेल्या सामन्यात न्यूझीलंडचा तीन गडी राखून पराभव करून तीन सामन्यांच्या वनडे मालिकेत श्रीलंकेने २-० अशी अभेद्य आघाडी घेतली आहे. कमी धावसंख्येच्या सामन्यात कुसल मेंडिसने बॅटने आश्चर्यकारक कामगिरी केली आणि संघाला विजय मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. अशा प्रकारे श्रीलंका संघाचा विजयरथ सनथ जयसूर्याच्या कोचिंगखाली काही महिन्यांपासून सुसाट धावताना दिसत आहे.

श्रीलंकेने मायदेशात सलग सहावी द्विपक्षीय वनडे मालिका जिंकली आहे. जुलै २०२१मध्ये भारताकडून पराभूत झाल्यापासून ते मायदेशात सलग १० मालिकेत अपराजित आहेत. या वर्षी श्रीलंकेने पाच द्विपक्षीय एकदिवसीय मालिका जिंकल्या आहेत, जे केवळ याआधी २०१४मध्येच साध्य करता आले होते. त्याचबरोबर श्रीलंकेने नोव्हेंबर २०१२पासून न्यूझीलंडविरुद्ध पहिलीच मालिका जिंकली आहे. सनथ जयसूर्याच्या प्रशिक्षणाखाली संघ पूर्णपणे बदलला आहे आणि जुन्या फॉर्ममध्ये परतला आहे.

सनथ जयसूर्याच्या प्रशिक्षणाखाली श्रीलंकेने भारताविरुद्धची एकदिवसीय मालिका जिंकली. इंग्लंडविरुद्धचा कसोटी सामना इंग्लंडमध्ये जिंकला. कसोटी मालिकेत न्यूझीलंडचा पराभव केला. वेस्ट इंडिजविरुद्धच्या टी-२० मालिका जिंकली. वेस्ट इंडिजविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत विजय. न्यूझीलंडविरुद्धची टी-२० मालिका अनिर्णित, तर न्यूझीलंडविरुद्धची एकदिवसीय मालिका जिंकली आहे.

श्रीलंका आणि न्यूझीलंड यांच्यात खेळल्या गेलेल्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात पावसाचा परिणाम दिसून आला. त्यामुळे सामना ४७-४७ षटकांचा करण्यात आला. या सामन्यात श्रीलंकेच्या कर्णधाराने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. किवी संघ प्रथम फलंदाजीसाठी उतरला आणि ४५.१ षटकांत २०९ धावांवर गारद झाला. श्रीलंकेने हे लक्ष्य ४६ षटकांत म्हणजे एक षटक आणि तीन गडी राखून पार केले आणि सामना सहज जिंकला.

श्रीलंकेच्या विजयात कुशल मेंडिसची भूमिका महत्त्वाची होती. त्याने ७४ धावांची शानदार खेळी केली. एका टोकाकडून तो एकटाच धावा काढत होता. या खेळीसाठी त्याला सामनावीर म्हणून गौरविण्यात आले.

# ओंकार साळवी ‘आरसीबी’चा नवा गोलंदाजी प्रशिक्षक?

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

एकीकडे आयपीएल २०२५ च्या हंगामाचा महालिलाव अवघ्या काही दिवसांवर येऊ ठेपला आहे. अशात आपल्या पहिल्या जेतेपदाच्या प्रतीक्षेत असणाऱ्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने मोठा निर्णय घेतला आहे. आयपीएल २०२५च्या महालिलावापूर्वी आरसीबी संघाने आपल्या नवीन गोलंदाजी प्रशिक्षकाचे नाव जाहीर करुन सर्वांना आश्चर्याचा मोठा धक्का दिला आहे. आरसीबीने मुंबई वरिष्ठ संघाचे मुख्य प्रशिक्षक ओंकार साळवी यांची गोलंदाजी प्रशिक्षक म्हणून नियुक्ती केल्याचे वृत्त आहे. याबाबत आरसीबीने अधिकृत घोषणा केलेली नाही.

ओंकार साळवी यांचा मुंबई क्रिकेट असोसिएशन (एमसीए) सोबतचा करार संपत आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे ओंकारने आपल्या कारकिर्दीत जितक्या विकेट्स घेतल्या आहेत, त्यापेक्षा जास्त म्हणजेच चार विकेट्स विराट कोहलीच्या नावावर फक्त आयपीएलमध्ये आहेत. ओंकारच्या लिस्ट-ए कारकिर्दीत फक्त एक विकेट आहे. तो रेल्वेकडून एकच सामना खेळला.

देशांतर्गत क्रिकेटमधील कोचिंगमध्ये साळवी हे मोठे नाव आहे. त्यांनी कोलकाता नाईट रायडर्सचे सहाय्यक प्रशिक्षक म्हणून काम केले आहे. ओंकार साळवी हे माजी भारतीय खेळाडू अविष्कार साळवी यांचे भाऊ आहेत. ओंकारच्या प्रशिक्षणाखाली मुंबईने रणजी करंडक जिंकला, तर पंजाब संघाने सय्यद मुश्ताक अली करंडक जिंकला. त्याचबरोबर इराणी ट्रॉफीमध्ये जेतेपद पटकावणाऱ्या मुंबईचे प्रशिक्षक होते.

# षटकाराने घायाळ झालेल्या चाहतीची संजू सॅमसनने सामन्यानंतर घेतली भेट



**डर्बन : वृत्तसंस्था**

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील चौथ्या टी-२० सामन्यात भारतीय फलंदाजांनी तुफान फटकेबाजी केली. यामध्ये संजू सॅमसन आणि तिलक वर्माच्या शतकाचा मोठा वाटा होता. भारताचा यष्टीरक्षक फलंदाज संजू सॅमसनने मैदानाच्या प्रत्येक कोपऱ्यात चौकार-षटकारांचा पाऊस पडला, पण या सामन्यात संजूच्या एका षटकारामुळे मैदानातील चाहती घायाळ झाली होती. तिची सामन्यानंतर संजूने भेट घेतली.

भारताच्या डावातील दहाव्या षटकात ही घडना घडली. या षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर संजू सॅमसनने ट्रिस्टन स्टब्सच्या गोलंदाजीवर मिडविकेटच्या दिशेने जबरदस्त षटकार लगावला. संजूने मारलेला षटकार प्रेक्षकांमध्ये असलेल्या एका वस्तूवर आदळला आणि तिथून उसळी घेऊन एका चाहतीच्या चेहऱ्यावर जाऊन बसला. अचानक झालेल्या या आघातामुळे चाहती रडू लागली. तिचा हा रडतानाचा फोटो सोशल मीडियावर वेगाने व्हायरल झाला. सामन्यानंतर संजू स्वत: जाऊन त्या चाहतीला भेटल्याचा व्हिडीओ समोर झाला आहे.

# ओमानच्या खेळाडूने केला विश्वविक्रम!

## टी-२०मध्ये दहाव्या क्रमांकावर तडाखेबंद फलंदाजी

**अल अमिरात : वृत्तसंस्था**

नेदरलँड्स आणि ओमान यांच्यात खेळल्या गेलेल्या तिसऱ्या टी-२० सामन्यात नेदरलँड्सने २९ धावांनी विजय मिळवला. यासह नेदरलँड्सने तीन सामन्यांची मालिका २-१ अशी जिंकली. या सामन्यात ओमानचा पराभव झाला असला तरी संघाचा खेळाडू शकील अहमद याने एक असा चमत्कार केला, ज्याची सर्वत्र चर्चा होत आहे. शकील अहमदने आंतरराष्ट्रीय टी-२०मध्ये एक मोठा विश्वविक्रम मोडला.

तिसऱ्या टी-२० सामन्यात नेदरलँड्सने प्रथम फलंदाजी करताना २० षटकात नऊ विकेट गमावून १४७ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात ओमानला नऊ गडी गमावून केवळ ११८ धावाच करता आल्या आणि



नेदरलँड्सने सामना २९ धावांनी जिंकला. या सामन्यात ओमानकडून १०व्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या शकील अहमदने टी-२० आंतरराष्ट्रीय विश्वविक्रम मोडीत काढला.

ओमानच्या डावात शकील अहमद १०व्या क्रमांकावर फलंदाजीला आला आणि त्याने ३३ चेंडूत ४५ धावांची खेळी केली. आपल्या या खेळीत त्याने तीन चौकार आणि दोन षटकार मारले. शकीलने ४५ धावांच्या या खेळीने वेस्ट इंडिजच्या अकील होसेनने केलेला विश्वविक्रम मोडला. आता तो टी-२० आंतरराष्ट्रीयमध्ये १०व्या क्रमांकावर फलंदाजी करताना सर्वात मोठी खेळी खेळणारा फलंदाज बनला आहे. यापूर्वी हा विश्वविक्रम होसेनच्या नावावर होता.

होसेनने २०२२ साली इंग्लंडविरुद्ध टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात १०व्या क्रमांकावर फलंदाजी करताना ४४ धावांची नाबाद खेळी खेळली होती. आता ओमानचा खेळाडू शकील अहमद टी-२० आंतरराष्ट्रीयमध्ये १०व्या क्रमांकावर फलंदाजी करताना सर्वात मोठी खेळी खेळणारा फलंदाज बनला आहे.

जीवेत् शरदः शतम्!
मनिषा जैन
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक
सरस्वती कांबळे

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com